


रविवार, २४ जुलै २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक ७
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

अंतरंग

शिवसेनेचे नंदुरबार जिल्हाप्रमुख भाजपमध्ये/२

एसटी बस ट्रेलरला धडकून एक ठार, १९ जण जखमी/३

रविवारनिमित्त अर्थविषयक सदर, पुस्तकांचे सदर/४, ६

# महाराष्ट्राच्या विकासाचा बॅकलॉग भरून काढणार

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन; भाजप प्रदेश कार्यकारिणीची बैठक उत्साहात

**पनवेल : प्रतिनिधी**

भाजप-शिवसेना युतीचे सरकार यावे ही तर श्रींची इच्छा होती. या ठिकाणी ईश्वर म्हणजेच महाराष्ट्राच्या १२ कोटी जनतेची अशी इच्छा होती. हिंदुत्ववादी विचारांच्या रक्षणासाठी राज्यात सत्ता परिवर्तन झाले असून बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचे खरे वारसदार भाजपबरोबर आले आहेत. महाविकास आघाडी सरकारच्या काळात निर्माण झालेला विकासाचा अनुशेष त्वरेने पूर्ण करून महाराष्ट्राला देशात पहिल्या क्रमांकाचे राज्य बनवू, असा विश्वास उपमुख्यमंत्री तथा भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि. २३) येथे व्यक्त केला. ते भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यकारिणी बैठकीच्या समारोपावेळी बोलत होते.

भाजपची प्रदेश कार्यकारिणी बैठक पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झाली. व्यासपीठावर प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, राष्ट्रीय सरचिटणीस व प्रदेश प्रभारी सी. टी. रवी, राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाश, प्रदेश सहप्रभारी जयभानसिंह पवय्या, ओमप्रकाश धुर्वे, केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, भाजप नेते व माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे, विजया रहाटकर, माजी विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, मुंबई भाजप अध्यक्ष मंगलप्रभात लोढा, आमदार आशिष शेलार, रायगडचे माजी पालकमंत्री व विद्यमान आमदार रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आदी व्यासपीठावर उपस्थित होते.



(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ८ वर..

या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात पुन्हा रयतेचे राज्य आल्यावर पहिली कार्यकारिणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगड जिल्ह्यात होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. छत्रपती शिवाजी महाराज गड जिंकल्यावर तेवढ्यावरच थांबायचे नाहीत, तर गडाची डागडुजी करायचे आणि चिरेबंदी, शिबंदी लावून पुढे जायचे. आपल्यालाही हेच करायचे आहे. महाराष्ट्रातील सत्तेचा गड जिंकला असला तरी आपण हे मानणारे आहोत की सत्ता आपले साध्य नसून साधन आहे. सामाजिक, आर्थिक परिक्रमाचा उपक्रम म्हणून त्याकडे पाहतो. म्हणूनच आपण हा गड जिंकलो असलो तरी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जी विकासाची यात्रा सुरू केली आहे त्या यात्रेत वेगाने पुढे जात विकासाच्या पहिल्या क्रमांकावर आणण्याचा गड जिंकल्याशिवाय थांबायचे नाही.

महाविकास आघाडी सरकारने विकासाला प्राधान्य देण्याऐवजी सूडबुद्धीचा कारभार सुरू केला होता. अनेक कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करून त्यांची छळवणूक केली गेली. या परिस्थितीतही कार्यकर्ते ठामपणे उभे राहिले. महाविकास आघाडी सरकारने वारंवार हिंदुत्ववादी विचारांची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान करायचा आणि दाऊदच्या विचारांचा बचाव करायचा असे प्रकार सहन न झाल्याने एकनाथ शिंदे यांनी सरकारमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. याबद्दल मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अभिनंदन करतो. महाविकास आघाडी सरकार सत्तेतून गेल्याने जनतेने आता मोकळा श्वास घेतला आहे. आमचे हिंदुत्व व्यापक आहे. आम्ही कोणाचेही लांगुलचालन करणार नाही, सर्वांना समान न्याय देऊ, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

भाजप नेतृत्वाने कधीही अडीच वर्षे मुख्यमंत्रिपदाचा शब्द दिला नव्हता. केवळ सत्तेसाठी त्यांनी जनादेशाचा अपमान केला, कारण काँग्रेस-राष्ट्रवादीबरोबर जायचे त्यांनी आधीच ठरवले होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांचे सहकारी चालवत आहेत. हीच खरी शिवसेना आहे. शिंदे यांना मुख्यमंत्री बनवून मी सरकारबाहेर राहून पक्षाचे कार्य करण्याचे ठरवले होते, परंतु पक्षाने मला सरकारमध्ये सहभागी होण्याचा आदेश दिला, मी तो पाळला. पक्षाचा आदेश माझ्यासाठी सर्वोच्च आहे. हा माझ्या दृष्टीने कृतकृत्यतेचा क्षण होता, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

उपमुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, राजकीय इच्छाशक्ती नसल्याने महाविकास आघाडी सरकारने ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण घालवले. आम्ही तातडीने आवश्यक कार्यवाही करून हे आरक्षण परत मिळवले. मराठा आरक्षण विषयही आम्ही मार्गी लावू. विकासाचा कार्यक्रम धडाक्याने राबवू.

नव्या सरकारने सत्तेत आल्या आल्या अनेक निर्णय घेतले. पेट्रोल-डिझेल स्वस्त केले. औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर, उस्मानाबादचे धाराशिव असे नामांतर केले, तर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव दिले. स्वच्छ महाराष्ट्र अभियानसाठी १२ हजार कोटींची तरतूद केली. गणेशोत्सव, दहीहंडीवरील निर्बंध उठवले. समुद्रात वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी निविदा काढली गेली. आरे कारशेडवरील बंदी उठवली. वारकऱ्यांना टोलमाफी दिली, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

दरम्यान, पनवेलमध्ये आलेल्या उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांचे दैवत लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन केले.

### उत्कृष्ट नियोजनाबद्दल मान्यवरांकडून कौतुक

महाराष्ट्र प्रदेश भाजप कार्यकारिणीची बैठक पनवेलमध्ये मोठ्या उत्साहात झाली. उत्कृष्ट आयोजन व यशस्वी नियोजन या बैठकीचे वैशिष्ट्य ठरले. यानिमित्ताने पनवेल परिसरात संपूर्ण वातावरण भाजपमय पहायला मिळाले. बैठकीसाठी आलेल्या सर्व मान्यवर तसेच प्रतिनिधींचे स्वागत ते समारोप, निवास, पार्किंग, भोजन अशी सर्व व्यवस्था उत्तम होती. त्यामुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्यासह सर्वांनी नियोजनाबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आणि सहकाऱ्यांचे कौतुक केले.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकण्यास सज्ज व्हा

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**पनवेल** : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांसमोर त्याग आणि शिस्तीचा आदर्श निर्माण केला आहे. पक्षाच्या आदेशानुसार काम करण्याच्या आपल्या सामर्थ्याच्या जोरावर आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकायच्या आहेत आणि पक्ष संघटना मजबूत करायची आहे, असे आवाहन प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी शनिवारी (दि. २३) येथे केले. भाजप प्रदेश कार्यकारिणी बैठकीच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. या वेळी प्रदेशाध्यक्ष पाटील यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे अभिनंदन करण्याचे आवाहन केल्यानंतर उपस्थित प्रतिनिधींनी जागेवर उभे राहून टाळ्या वाजवत प्रतिसाद दिला.



व्यासपीठावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय सरचिटणीस व प्रदेश प्रभारी सी. टी. रवी, राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाश, प्रदेश सहप्रभारी जयभानसिंह पवय्या, ओमप्रकाश धुर्वे, माजी प्रदेशाध्यक्ष सुधीर मुनगंटीवार, केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे, विजया रहाटकर, विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, मुंबई भाजप अध्यक्ष मंगलप्रभात लोढा, आमदार आशिष शेलार, रायगडचे माजी पालकमंत्री व विद्यमान आमदार रवींद्र चव्हाण, आमदार संजय कुटे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार श्रीकांत भारतीय व्यासपीठावर उपस्थित होते. (पान २ वर..)

**जनादेशाचा सन्मान, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, सामान्यांची सुरक्षितता आणि हिंदुत्व यासाठी भाजप-शिवसेना सरकार सत्तेवर आले आहे. भाजपला जनमत अनुकूल आहे. संघटनात्मक बांधणीत आता मोठी झेप घ्यायची आहे.**

**-शिवप्रकाश, राष्ट्रीय सहसंघटनमंत्री, भाजप**

### राज्यात विकासवादी व हिंदुत्ववादी सरकार -सी. टी. रवी

राष्ट्रीय सरचिटणीस व प्रदेश प्रभारी सी. टी. रवी यांनी सांगितले की, राज्यातील राजकीय परिवर्तनामुळे केंद्र सरकारच्याच विचारांचे विकासाचे डबल इंजिन सरकार महाराष्ट्रात सत्तेवर आले आहे. मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करतो. राज्यात विकासवादी व हिंदुत्ववादी सरकार आले आहे. आगामी काळात कठोर परिश्रम करून संघटना आणखी मजबूत करायची आहे आणि स्थानिक स्वराज्य संस्था, लोकसभा व विधानसभा निवडणुका जिंकायच्या आहेत.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन



## भाजप प्रदेश कार्यसमितीमध्ये विविध प्रस्ताव आणि ठराव

**पनवेल** : हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाच्या विचारांचा वारसा घेऊन युतीतून जन्माला आलेल्या सरकारचे नेतृत्व करणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पक्ष कार्यकर्त्यांना त्यागाचा आदर्श घालून देणाऱ्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव शनिवारी भाजपच्या प्रदेश कार्यसमितीत मंजूर करण्यात आल्याची माहिती भाजप नेते आमदार ॲड. आशिष शेलार यांनी दिली. प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये सोबत उपस्थित होते.


प्रदेश कार्यसमिती बैठक पनवेलच्या आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झाली. याबाबत माहिती देताना आमदार ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले की, या बैठकीत तीन प्रस्ताव संमत झाले. राजकीय, कृषिविषयक आणि ओबीसी राजकीय आरक्षण हे तीन प्रस्ताव मंजूर करण्यात आले.

राजकीय प्रस्ताव मांडताना गेल्या अडीच वर्षांत मविआ सरकारने राज्यात केलेल्या अधोगतीवर चर्चा करण्यात आली. भाजप नेते आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी हा प्रस्ताव मांडला तसेच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंच्या विचारातील शिवसेनेने केलेला उठाव व स्थापन झालेल्या सरकारचे अभिनंदन करण्यात आले.

या सरकारने ३० दिवस पूर्ण होण्याआधीच इंधन दरकपात, ओबीसी आरक्षण, शेतकऱ्यांना प्रोत्साहन असे वेगवेगळे निर्णय घेतले, तर छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, लोकनेते दि. बा. पाटील विमानतळाचे नामकरण असो वा गणेशोत्सव, दहीहंडी व मोहरमसारख्या सणांचा निर्णय घेतले. ज्या गतीने सरकार काम करीत आहे. पहिल्या तीन कॅबिनेटमध्ये महाराष्ट्र हिताच्या निर्णयांची मालिका शिंदे-फडणवीस सरकारने घेतली, त्याबद्दल सरकारचे अभिनंदन या ठरावात करण्यात आले. (पान २ वर..)

### उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते

# आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या वाड्याचे लोकार्पण





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे जन्मगाव असलेल्या पनवेल तालुक्यातील शिरढोण येथील त्यांच्या नूतनीकृत वाड्याचे लोकार्पण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शनिवारी (दि. २३) करण्यात आले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार गणपत गायकवाड उपमुख्यमंत्र्यांसमवेत होते.

आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे कार्य उल्लेखनीय आहे. त्यांनी इंग्रजांविरुद्ध असंतोष तयार केला. सशक्त क्रांतीचे बिजारोपण केले. त्यांच्या वाड्याच्या नूतनीकरणासाठी आपले सरकार असताना निधी मिळाला होता आणि त्याचे आज लोकार्पण होतेय हे मी भाग्य समजतो, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

येथील ग्रामपंचायतींकरिता ज्या काही योजना आपल्या मनात आहेत त्याकरिता एमएमआरडीएचा निधी देण्यासाठी मी प्रयत्न करेन. गावे चांगली व्हावीत तसेच ग्रामस्थांच्या आशा-आकांशा पूर्ण करण्यासाठी आवश्यक ते सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. या वेळी त्यांनी फडके यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. (पान २ वर..)



# भाजपचे पनवेलमध्ये विचारमंथन

## प्रदेश कार्यकारिणी बैठकीमुळे परिसर भाजपमय; मान्यवरांकडून कौतुक



**पनवेल : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाची प्रदेश कार्यकारिणी बैठक शनिवारी (दि. २३) पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आणि विविध मान्यवरांच्या उपस्थितीत झाली. बैठकीच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारपासूनच पनवेल आणि आसपासचा परिसर भगवामय झाला होता. भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आणि सहकाऱ्यांनी केलेल्या या बैठकीसाठीच्या नियोजनाबाबत उपस्थितांना कौतुक केले.

शनिवारी भाजप प्रदेश कार्यकारिणीची बैठक होणार म्हणून गेले काही दिवस पनवेल शहराला एक वेगळी झळाळी आली होती. राज्यस्तरावरील भाजपची ही बैठक असल्याने पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर हे जातीने प्रत्येक घडामोडीवर लक्ष ठेवून होते. भाजपच्या राज्यभरातून येणारे नेते, पदाधिकाऱ्यांच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली होती. बैठकीच्या पूर्वसंध्येला पनवेल शहर आणि परिसरात भाजपचे झेंडे लावण्यात आले होते. आकर्षक आणि आशयपूर्ण फलकही लक्ष वेधून घेत होते.

दरम्यान, या बैठकीत भाजप-शिवसेना सरकारच्या अभिनंदनाचा ठराव, ओबीसी आरक्षण राजकीय आरक्षण परत मिळविल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव याचबरोबर गेल्या काही दिवसांतच नवीन सरकारने घेतलेल्या विविध निर्णयावर पुन्हा एकदा आढावा घेतला जाईल. तसेच पक्षाबाबत आगामी दृष्टिकोनातून विविध निर्णय घेतले जातील अशी शक्यता वर्तविण्यात येत होती. या सर्व दृष्टीने आजची ही प्रदेश कार्यकारिणीची बैठक न भुतो न भविष्यती अशी झाली. बैठकीसाठी झालेल्या योग्य नियोजनाबद्दल सर्वच नेत्यांनी गौरवोद्गार काढले.

आगामी दृष्टीने पनवेल शहर आणि परिसराच्या एकूणच अधिकाधिक विकासाच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वाची मानली जात होती आणि ती यशस्वी झाली. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या सहकाऱ्यांमुळे या शहराला एक दिशा मिळाली आहे.

नव्या सरकारने ३० दिवस पूर्ण होण्याआधीच इंधन दरकपात, ओबीसी राजकीय आरक्षण, शेतकऱ्यांना प्रोत्साहन असे वेगवेगळे निर्णय घेतले, तर छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण असो वा गणेशोत्सव, दहीहंडी व मोहरमसारख्या सणांबाबत निर्णय सकारात्मक घेतले. अतिशय गतीने हे सरकार काम करीत आहेत. पहिल्या तीन कॅबिनेटमध्ये महाराष्ट्र हिताच्या निर्णयांची मालिका शिंदे-फडणवीस सरकारने घेतली. त्याबद्दल सरकारचे अभिनंदन या ठरावात करण्यात आले. दरम्यान, बैठकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

**आम्ही आमच्या जिल्ह्यातून निघालो तेव्हा दोन दिवस आधीपासून तुम्ही कधी येणार राहण्याची व्यवस्था काय याची चौकशी होत होती. स्टेशनपासून इथपर्यंत आणण्याची व्यवस्था केली होती. इथले वातावरण प्रसन्न वाटले. नाष्टा, जेवण याची व्यवस्था चांगली होती. कोठेही गडबड गोंधळ नव्हता. खूप छान व्यवस्था केली होती. आयोजकांना मनपूर्वक धन्यवाद!**

**-सरिता दाखवे (वर्धा)**

**खूप छान अतिशय उत्तम व्यवस्था, जेवणही रुचकर होते. मन लावून केलेले काम आहे. लोकलमधून उतरलो तर कार्यकर्ते घ्यायला दारात उभे होते. एकदम ओके कार्यक्रम झाला. आयोजकांना धन्यवाद!**

**-विवेकानंद उजळंबकर (लातूर)**

**पावसाळी वातावरणात पनवेलसारख्या ठिकाणी अशी चांगली व्यवस्था करणे अशक्यप्राय असताना अत्यंत छान चांगल्या पध्दतीने व्यवस्था केली होती. आमदार प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या सर्व टिमला मनापासून धन्यवाद!**

**-लक्ष्मण सावजी (नाशिक)**

**इथली व्यवस्था मस्त वाटली. स्वागत सुंदर, राहण्याची व्यवस्था छान, जेवण, नाष्टा चांगला होते. पनवेलमध्ये सर्वत्र लावलेले झेंडे, फलक यामुळे कार्यकर्ते चार्ज होतात. आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी व त्यांच्या टीमला सर्वांना धन्यवाद. मी, रवींद्र चव्हाण यांना चांगली व्यवस्था केल्याचे सांगितल्यावर त्यांनी त्याचे श्रेय आमदार प्रशांत ठाकूर यांचे असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशांतजींनी मात्र जे चांगले आहे ते सर्वांचे, वाईट ते माझे असे सांगितले.**

**-नीता केळकर (सांगली)**



## ओबीसी आरक्षण परत मिळवून दिल्याबद्दल भाजप-शिवसेना युती सरकारचे अभिनंदन

### प्रदेश कार्यकारिणी बैठकीत ठराव





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ओबीसी समाजाला राजकीय आरक्षण परत मिळवून दिल्याबद्दल भारतीय जनता पक्ष-शिवसेना महायुती सरकारचे अभिनंदन करणारा ठराव शनिवारी पनवेल येथे झालेल्या भाजप प्रदेश कार्यकारिणी बैठकीत मंजूर करण्यात आला. हिंदुत्वाचा विचार आणि जनादेशाचा सन्मान करण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिवसेना व सहयोगी आमदारांचे अभिनंदनही बैठकीत करण्यात आले. पक्षशिस्तीचा नवा आदर्श निर्माण करणाऱ्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कार्यकारिणी बैठकीत धन्यवाद देण्यात आले.

कार्यकारिणी बैठकीत माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी राजकीय प्रस्ताव, प्रदेश सरचिटणीस आ. चंद्रशेखर बावनकुळे यांनी ओबीसी आरक्षण विषयक तर किसान मोर्चा प्रदेशाध्यक्ष वासुदेव काळे यांनी शेती विषयक प्रस्ताव मांडला.

राजकीय प्रस्तावात म्हटले आहे की, २०१९मध्ये महाराष्ट्राच्या जनतेने भाजप-शिवसेना सरकारला १६१ जागांसह स्पष्ट बहुमत दिले होते, मात्र केवळ मुख्यमंत्रीपदासाठी शिवसेनेने भाजपची साथ सोडत काँग्रेस-राष्ट्रवादीशी हातमिळवणी केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धाडस करत हिंदुत्वाच्या विचारांचे सरकार सत्तेत यावे यासाठी पुढाकार घेतला.

महाविकास आघाडी सरकारने नाकर्तेपणामुळे ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण घालवले. हे आरक्षण परत मिळावे यासाठी भारतीय जनता पक्षाने राज्यव्यापी आंदोलन केले. सत्तेत आल्या आल्या हे आरक्षण परत मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने आवश्यक ती कार्यवाही केली, असे या संबंधीच्या प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात शेतकरी पुरता उद्ध्वस्त झाला. नैसर्गिक संकटाच्या काळात महाविकास आघाडी सरकारने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडल असे शेतीविषयक प्रस्तावात नमूद करण्यात आले आहेत.



## नंदुरबार जिल्हा शिवसेनाप्रमुख डॉ. विक्रांत मोरेंचा भाजपमध्ये प्रवेश

### सांगली जिल्ह्यातील १०० काँग्रेस कार्यकर्तेही दाखल; पनवेलमध्ये पक्षप्रवेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नंदुरबार जिल्हा शिवसेना प्रमुख डॉ. विक्रांत मोरे, नगरसेविका शोभाताई मोरे, नगरसेवक अर्जुन मराठे, नगरसेवक मिलिंद बाफना यांनी शनिवारी पनवेल येथे भाजप प्रदेश कार्यकारिणी बैठकीत असंख्य कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला. याचवेळी पलूस (जि. सांगली) येथील उद्योजक आणि सुमारे १०० काँग्रेस कार्यकर्त्यांनीही भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला आहे.

प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश प्रभारी खासदार सी. टी. रवी, प्रदेश सरचिटणीस आ. श्रीकांत भारतीय, केंद्रीय प्रवक्त्या खा. डॉ. हीना गावित, माजी मंत्री आ. विजयकुमार गावित, सांगली जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज देशमुख आदी या वेळी उपस्थित होते.

## कोरोना काळात आदित्य ठाकरे कुठे होते?

आमदार नितेश राणे यांचा सवाल



**मुंबई : प्रतिनिधी**

कोरोना काळात मुंबईत माणसे कोरोनाने मरत होती, तेव्हा आदित्य ठाकरे कुठे होते असा थेट सवाल आमदार नितेश राणे यांनी केला आहे.

राज्यात नवीन सरकार आल्यानंतर शिवसेना आणि शिंदे समर्थक गटामध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. आमदार, खासदार, नगरसेवक आणि त्यानंतर शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते शिंदे समर्थक गटात जात असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. या मुळे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे त्यांचे पुत्र शिवसेना नेते आदित्य ठाकरे आणि त्यांचे समर्थक सध्या शिंदे गटावर आरोपांच्या फैरी झाडत आहेत. याच दरम्यान केंद्रीयमंत्री नारायण राणे यांचे पुत्र आमदार नितेश राणे यांनी राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंवर ट्वीटरवरुन गंभीर आरोप केले आहेत.

नारायण राणेंनी शिवसेना सोडल्यानंतर उद्धव ठाकरेंनी त्यांची अनेकदा सुपारी दिल्याचा आरोप नितेश राणे यांनी केल्यानंतर पत्रकार परिषद घेऊन त्यांनी सध्या महाराष्ट्रभर शिवसंवाद यात्रा करणाऱ्या आदित्य ठाकरेंवरही टीका केलीय. यावेळी राणे यांनी कोरोना काळात आदित्य ठाकरे अभिनेता डिनो मोरिया यांच्या घरी सायकाळी सात वाजता काय करायचे असा प्रश्नही विचारला आहे. माझ्या वडिलांनी जेव्हा शिवसेना सोडली, तेव्हा एकनाथ शिंदेप्रमाणेच त्यांनाही त्रास देण्यात आला. आता हे 'म्याव म्याव' संपवून टाकूया आणि आपण व्याजासह वस्त्रहरण सुरु करु, असेही नितेश राणे हे ट्वीटरवरुन म्हणाले आहेत.

## ज्येष्ठ साहित्यिक नंदा खरे यांचे निधन

**पुणे/नागपूर : प्रतिनिधी**

विवेकवादी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचे पुरस्कर्ते ज्येष्ठ साहित्यिक-कादंबरीकार अनंत ऊर्फ नंदा खरे यांचे पुण्यात दीर्घ आजाराने शुक्रवारी निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते. त्यांच्यामागे पत्नी, मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे.




मराठी साहित्यातील विविध प्रांतांत मोलाची भर घालणारे खरे विवेकवादी आणि वैज्ञानिक दृष्टीचा पुरस्कार करणारे लेखक म्हणून ओळखले जात. 'अंताजीची बखर', 'उद्या', 'बखर अंतकाळाची' या त्यांच्या कादंबऱ्या वाचकप्रिय झाल्या. मानवाच्या जडणघडणीचा साद्यंत अभ्यास करून त्यांनी सिद्ध केलेला 'कहाणी मानवप्राण्याची' हा ग्रंथ त्यांच्या वैचारिक लेखनाची ओळख घडवणारा ठरला आहे. नंदा खरे यांनी वृत्तपत्रीय लेखनही विपुल प्रमाणात केले आहे. वैचारिक भूमिकेशी ठाम राहून कोणतीही तडजोड न करता लेखन करणारा साहित्यिक हीच त्यांची खासियत होय. दरम्यान नंदा खरे साहित्य क्षेत्रातील मोठे व्यक्तिमत्त्व होते. नागपुरातील सोन्यासारखा माणूस गेला. साहित्यिक म्हणून त्यांचे मोठे योगदान होते. कुठल्याही माणसाने पुस्तक उचलले आणि नंदा खरेंचे पुस्तक कळले असे होत नाही. त्यांचे लेखन स्वतंत्र प्रतिभेतून आणि स्वतंत्र विचारशैलीतून जन्मले होते. अशा शब्दात ज्येष्ठ नाटककार महेश एलकुंचवार यांनी तर ज्येष्ठ साहित्यिक डॉ. गणेश देवी यांनी नंदा खरे यांच्या जाण्याने साहित्य क्षेत्राचे फार मोठे नुकसान झाले अशा शब्दात खरे यांना श्रध्दांजली वाहिली आहे.

## 'ईडी'कडून नीरव मोदीला आणखी एक दणका

### हाँगकाँगमधील २५३ कोटींची मालमत्ता जप्त

**मुंबई : प्रतिनिधी**

पंजाब नॅशनल बँकेची सुमारे ६ हजार ४९८.२० कोटी रुपये फसवणूक केल्या प्रकरणातील मुख्य आरोपी नीरव मोदी सध्या ब्रिटनच्या तुरुंगात आहे. दरम्यान, केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) या प्रकरणी चौकशी करत आहे. तर 'ईडी'ने नीरव मोदी समूह कंपन्यांच्या २५३ कोटी ६२ लाख रुपये किमतीची हाँगकाँगमधील मालमत्ता जप्त केली. त्यात रत्ने, दागिने आणि बँक ठेवींचा समावेश असल्याची माहिती 'ईडी'कडून शुक्रवारी देण्यात आली आहे.



नीरव मोदीवर २०१८मध्ये सर्वप्रथम सीबीआयने गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याच्या आधारे ईडीने तपास करताना हाँगकाँग येथेही नीरव मोदी याची काही मालमत्ता असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर ईडीच्या अधिकाऱ्यांनी मनी लॉड्रिंगप्रकरणी स्वतंत्र गुन्हा दाखल करत शुक्रवारी त्याची हाँगकाँग येथील मालमत्ता जप्त केली. जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये काही लॉकर्समधे पडून असलेले हिरे, दागिने यांचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे, तर बँकांत असलेल्या रोखीच्या रकमेचादेखील समावेश आहे. ईडीच्या म्हणण्यानुसार, ६ हजार ४९८.२० कोटी रुपयांच्या पीएनबी बँकेच्या फसवणूक प्रकरणात गैरव्यवहार प्रतिबंधक कायदा,२००२ अंतर्गत सक्तवसुली प्रकरण माहिती अहवाल नोंदवून तपास सुरू केला होता. ईडीने नीरव मोदी समूह कंपन्यांची हाँगकाँगमधील मालमत्ता जप्त केली आहे.

पान १ वरून

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकण्यास सज्ज व्हा

प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील पुढे म्हणाले की, गेल्या अडीच वर्षांत भाजपने राज्यात विविध निवडणुका जिंकल्या व जनतेच्या प्रश्नांवर संघर्ष केला. आघाडी सरकारने भाजपच्या कार्यकर्त्यांना चिरडण्यासाठी अनेक प्रयत्न केले, पण एकही कार्यकर्ता डगमगला नाही. कार्यकर्त्यांचे नेतृत्व विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केले. राज्यात आघाडी सरकारच्या काळात हिंदुत्व संकटात आले. नवे सरकार सत्तेवर येणे गरजेचे होते. अशा स्थितीत एकनाथ शिंदे यांनी नेतृत्वाला आव्हान दिल्यानंतर भाजपने त्यांना मुख्यमंत्रिपदासाठी पाठिंबा दिला.

भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रदेश सरचिटणीस आमदार रवींद्र चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रदेश सरचिटणीस आमदार अतुल सावे यांनी शोकप्रस्ताव मांडला.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन

स्वातंत्र्यांच्या अमृत महोत्सवानिमित्ताने घर घर तिरंगा या अभियानासह सशक्त बूथ यंत्रणा, आगामी निवडणुकांसाठी भाजपची व्यूहरचना, ज्या बूथवर कमी मतदान झाले त्या ठिकाणी मतदान वाढवण्यासाठी काम, ग्रामपंचायत व जिल्हा परिषद निवडणुकीत हा विचार घेऊन संघटनात्मक रचना याबाबतही सविस्तर चर्चा या वेळी करण्यात आल्याची माहिती आमदार ॲड. शेलार यांनी दिली.

## आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या वाड्याचे लोकार्पण

आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून वनवासी बांधवांसाठी फिरता दवाखाना उपलब्ध करून देण्यात आला असून या दवाखान्याचे उद्घाटन या वेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमास तहसीलदार विजय तळेकर, भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, राज पाटील, भाजप नेते विनोद साबळे, माजी जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, शिरढोण ग्रामपंचायतीच्या सरपंच साधना कातकरी, उपसरपंच रेश्मा वाजेकर, माजी सरपंच गजानन घरत, माजी उपसरपंच मंगेश वाकडीकर, विजय भोपी, ग्रामपंचायत सदस्य संगीता चौधरी, मोनाली घरत, निकिता चौधरी, सानिका कातकरी, सुदाबाई माळी, माजी सदस्य प्रमोद कर्णेकर, सांगुर्ली ग्रामपंचायतीच्या सदस्य सुवर्णा पाटील, माजी सरपंच दत्तात्रेय हातमोडे, साधना वाजेकर, पळस्पे ग्रामपंचायतीचे सदस्य सुनील गवंडी, विजय गवंडी, प्रतीक भोईर, शरद वांगिलकर, मंदार जोग, भाजप गाव अध्यक्ष नितेश मुकादम आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.





# ...अन्यथा बेमुदत बंद करू

## कामगार नेते सुधीर घरत यांचा जेएनपीए प्रशासनाला इशारा





**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

भारतीय मजदूर संघटनेचा ६८वा वर्धापन दिनाच्या निमित्ताने जेएनपीएच्या कामगार वसाहतीमधील बहुउद्देशीय सभागृहात शनिवारी (दि. २३) कामगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कामगार नेते सुधीर घरत म्हणाले की, ९५० कंत्राटी कामगारांच्या न्यायासाठी २९ जुलै रोजी एकदिवसीय काम बंद आंदोलन करण्यात येणार आहे. त्यानंतरही जेएनपीए प्रशासनाचे डोळे उघडले नाही तर कामगारांच्या न्याय हक्कासाठी जेएनपीएविरोधात बेमुदत बंदची हाक द्यावी लागेल.

या कामगार मेळाव्यात भारतीय मजदूर संघाचे रायगड जिल्हाध्यक्ष सुरेश पाटील, जेएनपीटीचे माजी कामगार विश्वस्त रवींद्र पाटील, जनार्दन बंडा यांचीदेखील भाषणे झाली. व्यासपीठावर संघाचे जिल्हा संघटन मंत्री रंजन कुमार, जिल्हा उपाध्यक्ष मधुकर पाटील, लंकेश म्हात्रे, धर्माजी पाटील, प्रमोद पाटील आदी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी भारतीय मजदूर संघटनेचे कोषाध्यक्ष तथा कामगार नेते सुधीर घरत यांनी कामगारांना मार्गदर्शन करताना संघटनेचे महत्त्व पटवून दिले. संघटनेच्या यशाचे श्रेय हे कामगारांच्या एकतेमध्येच असल्याचे सांगतानाच त्यांनी महाभारताच्या युध्दाचे उदाहरण दिले.कौरवसेनेत एकापेक्षा एक शुरवीर बलाढ्य महायोध्दे असतानाही प्रत्येकाच्या मिपणामुळे कधीही एकसंघ होऊन लढले नाहीत.त्याउलट संख्येने कमी असतानाही श्रीकृष्णाच्या मार्गदर्शनाखाली एकसंघ होऊन लढलेल्या पांडवांनी विजय मिळवला. त्यामुळे भारतीय मजदूर संघटनेच्या यशाचे श्रेयही एकतेमध्येच आहे. संघटनेत मी पणाला अजिबात थारा नाही, असे रोखठोक विचार कामगार नेते सुधीर घरत यांनी मांडले.

### कंत्राटी कामगारांच्या न्यायासाठी आंदोलन

**काही जेएनपीएचे अधिकारी स्वताच्या स्वार्थासाठी कामगारांच्या हिताशी खेळत आहेत. त्यांचे न्याय हक्क डावळत आहेत. त्यामुळेच ९५० कंत्राटी कामगारांच्या न्यायासाठी २९ जुलै २०२२ रोजी एक दिवसीय काम बंद आंदोलन करण्यात येणार आहे, असेही या मेळाव्यात कामगार नेते सुधीर घरत यांनी सांगितले.**

## एसटी बस ट्रेलरला धडकली; चालक ठार, १९ प्रवासी जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील एक्स्प्रेस महामार्गावर मध्यरात्री अडीच सुमारास उभ्या ट्रेलरला पाठीमागून आलेल्या एसटी बसची धडक बसली. झालेल्या अपघातात एसटी बसचालकाचा गंभीररित्या जखमी होऊन मृत्यू झाला, तर बसमधील १९ प्रवाशी जखमी झाले. त्यांना कामोठे एमजीएम रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.

सोलापूर येथून अर्नाळा विरार या ठिकाणी एसटी बस (एम एच ०९ इएम ९६४१) ही घेऊन बसचालक अशोक गायखे (वय ३३, रा. उस्मानाबाद) हा चालला होता. या वेळी पनवेल जवळील एक्स्प्रेस महामार्ग क्रमांक १०/ ५०० च्या हद्दीत ट्रेलर (एमएच ४६ एएफ २८६४) उभा होता. त्याला या एसटी बसची पाठीमागून जोरदार धडक बसली. झालेल्या अपघातात बसचालकाचा गंभीररित्या जखमी होऊन मृत्यू झाला, तर बसमधील १९ प्रवाशी जखमी झाले. त्यांना कामोठे एमजीएम रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.

अपघाताची माहिती मिळताच वाहतूक शाखेचे पोलिसांचे पथक, आयआरबीचे गस्त पथक, पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी रवाना झाले व त्यांनी तत्काळ जखमींना रुग्णालयात उपचारार्थ पाठविले तसेच अपघात गस्त वाहनांना बाजूला करण्यात आले.





**पनवेल : भाजप पनवेल तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या वेळी तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी तसेच मानवी पाटील, निशा वाडकर, चंद्रकांत नाईक, नाझीर शेख उपस्थित होते.**

## लग्नाचे प्रलोभन दाखवून तरुणीची फसवणूक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी वावेघर येथील एका तरुणाने प्रेमसंबंध करीत लग्नाचे प्रलोभन दाखवून तरुणीसोबत शारिरीक संबंध ठेवल्याची घटना रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.

याबाबत रसायनी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, वावेघर येथील लक्ष्मण सिताराम चव्हाण (वय २६) याने गावातील एका तरुणीसोबत प्रेमसंबंध करून तिला लग्नाचे आमिष दाखवून व त्याचे मोबाइल फोनमधील फोटो प्रसारीत करण्याची धमकी दिली तसेच मोहोपाडा येथील गुडलक लॉजवर घेऊन जाऊन तरुणीच्या इच्छेविरुद्ध शारिरीक संबंध ठेवले. मागील दिवाळीच्या वेळी तरुणीस गुडलक लॉज येथे मारहाण करून वावेघर गावात आरोपी व फिर्यादींचे प्रेमसंबंध, शारिरीक संबंध ठेवल्याबाबतची बदनामी केली.

या प्रकरणी फिर्यादीने आई व नातेवाइक यांच्यासोबत चर्चा विनिमय करून याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. याबाबत लक्ष्मण सीताराम चव्हाण (वय २६) यांच्याविरोधात रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला असून या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## पनवेल महापालिका मुख्यालयात लोकमान्य टिळक जयंती साजरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेतील मुख्यालयात लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी आयुक्त गणेश देशमुख, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, हरेश जाधव, पालिका कर्मचारी उपस्थित होते.



## रोटरी क्लबतर्फे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तरवाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा आणि रोटरी क्लब ऑफ बॉम्बे बेव्यू यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद शाळा दापिवली, पोसरी, पोसरी कातकरीवाडी, गुळसुंदे कातकरवाडी या शाळेतील मुलांना दप्तर वाटप करण्यात आले.

या वेळी रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे अध्यक्ष अमित शाह, देवेंद्र, शानबाग, बाळकृष्ण होणावळे तसेच डॉ. युगांधरा, अध्यक्ष अमित शाहचा भाचा मनीत आणि एनेट तनिष्का उपस्थित होते. या वेळी विद्यार्थ्यांना शालेय दफ्तर मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण दिसून आले.



## अक्कादेवी धरण येथे ‘अभिनव’कडून स्वच्छता मोहीम

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

इतिहास प्रसिद्ध चिरनेर गावातील निसर्ग रम्य अक्कादेवी धरण सध्या पावसाळ्यात पर्यटकांचे आकर्षण केंद्र बनले आहे. शनिवार व रविवार या सुटीच्या दिवशी अनेक पर्यटक नागरिक कुटुंबासह या परिसराचा आनंद लुटण्यासाठी ये-जा करत असतात. अशा पर्यटकांकडून परिसरात टाकण्यात येणारा कचरा उचलण्याचे काम चिरनेर गावातील अभिनव मित्र मंडळाच्या वतीने देशाच्या ७५ व्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने शुक्रवारी (दि. २२) हाती घेतले आहे. अभिनव मित्र मंडळाच्या या समाजाभिमुख कार्याबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

चिरनेर गावातील अभिनव मित्र मंडळाचे पदाधिकारी हे मंडळाचे अध्यक्ष तथा माजी सरपंच पद्माकर फोफेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली गेली ३० वर्षे परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबवित आहेत. या मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी, सदस्यांनी सामाजिक बांधिलकी जपत कोरोना काळामध्ये नागरिकांना मौलाचे सहकार्य केले. या कार्याची दखल घेऊन अभिनव मित्र मंडळाला पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

देशाच्या ७५व्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून चिरनेर ग्रामपंचायत व घंटागाडी कर्मचारी महेश चिरनेरकर यांच्या सहकार्याने अभिनव मित्र मंडळाचे संस्थापक चिरनेरचे माजी सरपंच पद्माकर फोफेरकर, अध्यक्ष सुनील नारंगीकर, उपाध्यक्ष विकास म्हात्रे, सदस्य जीवन नारंगीकर, प्रवीण म्हात्रे, विश्वजीत म्हात्रे, किरण नारंगीकर, रोशन मोकल, रवींद्र भगत, गणेश म्हात्रे, संतोष भगत, विश्वास मोकल, कल्लू सिंग, राजेंद्र भगत, यतीन फोफेरकर, आयुष नारंगीकर, स्वरूप म्हात्रे, कौशल मोकल, दर्पण भगत, आश्वेत भगत, संकल्प भगत, मिहीर म्हात्रे यांनी अक्कादेवी धरण परिसरातील कचरा गोळा करून घंटागाडीत भरून दूर फेकून परिसर स्वच्छ केला आहे.



## लायन्स क्लब ऑफ उरणचा सुवर्ण महोत्सव उत्साहात



**उरण : बातमीदार**

लायन्स क्लब ही सामाजिक क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय संघटना असून २००हून जास्त देशांत कार्यरत असणाऱ्या या संस्थेतर्फे विविध सामाजिक उपक्रम समाजात राबविले जातात. अशाच प्रकारचे उपक्रम लायन्स क्लब ऑफ उरणच्या माध्यमातून राबविण्यात आले असून लायन्स क्लब ऑफ उरणचा ५०वा वर्धापन दिन साजरा झाला.

या वेळी खूप चांगले कार्य लायन्स क्लब ऑफ उरणच्या माध्यमातून सुरू आहे, असे गौरवोद्गार लायन्स क्लबचे पीएमजेएफ इन्स्टॉलेशन ऑफिसर राकेश चौमल यांनी काढले.

नवीन सदस्य ॲड. जागृती गायकवाड, प्रवीण थळी, अक्षता गायकवाड, संजीवनी कुथे, नितीन कोळी, डॉ. पल्लवी पाटील यांनी शपथ घेतली. नवीन वर्षाची कार्यकारिणी घोषित करण्यात आली. लायन्स क्लब ऑफ उरणच्या प्रसिडेंटपदी एमजेएफ सदानंद गायकवाड, सेक्रेटरीपदी एमजेएफ डॉ. साहेबराव ओहोळ, ट्रेझररपदी प्रमिला गाडे, उपाध्यक्षपदी निलिमा नारखेडे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कोठावदे यांची निवड करण्यात आली.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वृक्षारोपण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वनस्पती विभागातर्फे नेचर क्लब व डी.एल.एल.ई यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्ष संवर्धन दिवसानिमित्त शनिवारी (दि. २३) वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता सिदधता कक्षाच्या प्रा. महेश्वरी झिरपे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग तसेच विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.





या वेळी कॉलेजच्या आवारात विविध प्रकारच्या वनस्पतीचे झाम्पलृान व माहिती मिळाली व वृक्ष संवर्धनाचे महत्त्व कळले. वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन वनस्पती विभाग व नेचर क्लब प्रमुख प्रा. सफिना मुकादम यांनी केले, तसेच डी.एल.एल. ई प्रमुख प्रा. महेश धायगुडे, एन.एस.प्रमुख प्रा. रोहित पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नेचर क्लब सभासद, डी.एल.एल. ई सभासद सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनीनी सहकार्य केले. सर्व सभासदाच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वीरितीने झाला.

वृक्षारोपणाचे आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड तसेच संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्राध्यापकांचे कौतुक केले, तसेच वृक्षारोपण यशस्वीपणे आयोजन केल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख व संस्थेचे सचिव डॉ. सिदेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## तुरमाळे येथील शाळेत वह्यावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने शनिवारी (दि. २३) रायगड जिल्हा परिषदेच्या चिरवत तुरमाळे येथील शाळेत विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

या वेळी सांगुर्ली ग्रामपंचायतीचे सदस्य शरद वांगीलकर, शक्ती केंद्र प्रमुख (सांगुर्ली) ॲड. निलेश हातमोडे, बूथ अध्यक्ष (तुरमाळे) विशाल गायकर, राजे प्रतिष्ठान दुर्ग सवंर्धन विभाग पनवेल तालुका अध्यक्ष सतिश हातमोडे, धीरज शितकंदे व शिक्षकवर्ग, विद्यार्थी तसेच इतर ग्रामस्थ उपस्थित होते.



## वातावरणात बदल

**पनवेल :** पाऊस पडत असल्याने वातावरणात बदल जाणवू लागला आहे. वातावरणातील हा बदल अनेक आजारांना आमंत्रण देत असून डॉक्टरांनी नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

URGENTLY REQUIRED (PANVEL)
• COUNSELOR- 1 Post
Qual - Graduate with exp. 5 years
• TRAINER (FIRE SAFETY)- 3 Posts
Qual - Fire Safety course with 3-5 Years industrial or teaching exp.
• FRONT OFFICE/ (Female) - RECEPTIONIST 2 Posts
Qualification- 12th with Fluency in English
• DRILL INSTRUCTOR- 1 Post
Retired from defence services (Army, Navy,Air force,BSF etc)
Freshers can also apply
Send resume to 'aifspanvel@gmail.com'
Interview on July 22-23, 2022 between 10.30 AM - 05.00 PM
Asian Institute of Fire Safety
2nd Floor, Laxmi Public School, Near Sukapur Bus Stop, Sukapur, New Panvel - 410206.
Contact No.: 8928307320, 9082677278

# ‘मेडिकल टुरिझम’मध्ये भारताला संधीच संधी!

+Health

*‘मेडिकल टुरिझम’ म्हणजे दुसऱ्या देशात जाऊन आजारावर उपचार करून घेणे. अनेक देशांनी असे पर्यटन जाणीवपूर्वक वाढविले आहे. भारतातही असे पर्यटन वाढविण्याची प्रचंड क्षमता आहे, मात्र त्यासाठीचे विशिष्ट धोरण नसल्याने हा विषय पुढे जाऊ शकला नाही. आता लवकरच असे धोरण जाहीर होण्याची शक्यता असून त्याचा भारताला मोठा लाभ होईल.*




आपल्या आजारावर चांगले उपचार मिळावेत, यासाठी अमेरिकेतून खासगी विमानाने बंगळूरला अलिकडेच एक रुग्ण आला. त्याला येथे आणण्यासाठी तब्बल एक कोटी रुपये फक्त प्रवासावर खर्च झाले. हा रुग्ण हा श्रीमंत असेल, म्हणून खर्चाचा विषय बाजूला ठेवू. पण त्याला भारतात उपचार घ्यावे वाटतात, हे येथे महत्त्वाचे आहे. भारतातील आरोग्य व्यवस्था अमेरिकेपेक्षा चांगली आहे, हे येथे सिद्ध करावयाचे नाही. मात्र विकसित देशांची बरोबरी करू शकेल, अशा आरोग्य सुविधा भारतात निर्माण होत आहेत, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच भारतात उपचार करून घेणाऱ्या विदेशी नागरिकांची संख्या गेल्या काही दिवसात वाढत चालली आहे. जगात ‘मेडिकल टुरिझम’ असे नाव त्याला देण्यात येते. भारतीय मानसिकतेत ही बाब बसणारी नसली तरी असा विचार करणारे अनेक देश जगात असून ते या प्रकारे परकीय चलन मिळवीत आहेत. शिवाय, वैद्यकीय क्षेत्राचे गेल्या काही वर्षांत व्यावसायिकरण झाले आहे, हे आपण नाकारू शकत नाही. ही सर्व स्थिती आणि भारताने या क्षेत्रात मिळविलेले यश लक्षात घेता ‘मेडिकल टुरिझम’ वर भर देण्याचा स्वागतार्ह निर्णय सरकारने घेतला आहे.

### ‘मेडिकल टुरिझम’ची गरज का?

अमेरिका आणि युरोपमध्ये आरोग्याच्या सुविधा फार चांगल्या आहेत आणि प्रत्येक जण मेडिकल इन्शुरन्स काढत असल्याने तेथे त्यांना वैद्यकीय उपचाराचा फारसा खर्च येत नाही, हे आपण ऐकून आहोत. पण त्यामुळे तेथील वैद्यकीय उपचार प्रचंड महाग झाले आहेत आणि तेथे आजारी पडले की डॉक्टरची लगेच भेट मिळत नाही, त्यासाठी बरीच प्रतीक्षा करावी लागते, हेही आपण ऐकले आहे. त्यामुळेच अनिवासी भारतीय जेव्हा भारतात येतात, तेव्हा त्यांचा येथे इन्शुरन्स नसतानाही ते येथे उपचार करून घेतात, असे आपण पाहिले आहे. कारण विकसित देशांपेक्षा भारतात अतिशय स्वस्तात आणि अर्थातच चांगले उपचार होतात, असे त्यांना वाटते.‘मेडिकल टुरिझम’चा सरकार गंभीरपणे विचार करते आहे, याचे हेच कारण आहे. अर्थात, सध्या अनेक विदेशी नागरिक भारतात येवून उपचार करून घेतातच, पण त्याचे स्वरूप संघटीत नसल्याने त्याविषयीची खात्रीशीर माहिती मिळू शकत नाही. हीच गोष्ट ठरवून केली आणि त्यात येणारे अडथळे दूर केले तर भारतासाठी एक नवे दालन खुले होईल, यासाठी‘मेडिकल टुरिझम’ चे धोरण राबविले जाणार आहे.

### विकसित देश महागडे

आयुर्वेद उपचार ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे. त्याच्याकडे जग आकर्षित झाले आहे. त्यामुळेच काही भारतीय वैद्य अनेक देशात उपचार करतात. मात्र आयुर्वेद उपचारांचे प्रमाणीकरण झाले नाही, म्हणून त्याला एक शास्त्र म्हणून काही देशांमध्ये मान्यता मिळालेली नाही. आयुर्वेदाचे संशोधन झालेल्या तसेच एक उपचार पद्धती म्हणून अधिक स्वीकार झालेल्या केरळमध्ये त्याचा वापर अधिक आहे. अनेक विदेशी नागरिक केरळमध्ये आयुर्वेद उपचारांसाठी येतात तसेच त्याचे महत्त्व लक्षात घेवून अनेक जण तेथे आयुर्वेदाचे शिक्षण घेवून परदेशात वैद्य म्हणून काम करत आहेत. पण भारतातील ‘मेडिकल टुरिझम’ हा काही केवळ आयुर्वेदापुरता मर्यादित असणार नाही. तर तो ॲलोपथी उपचारासाठीही असणार आहे. त्याचे कारण विकसित देशात महागडी ठरणारी वैद्यकीय सेवा, भारताचे समतोल हवामान आणि आधुनिक वैद्यकीय सेवांबाबत भारताने अलिकडील काळात केलेली प्रगती. शिवाय जगाला औषधांचा पुरवठा करणारा भारत एक प्रमुख देश असल्याने भारतात ती तुलनेने स्वस्त आहेत.

### ८० अब्ज डॉलरची उलाढाल

भारतीय पर्यटन खात्याच्या एका अभ्यासानुसार २०१६मध्ये भारतात उपचार घेण्यासाठी सुमारे सव्वा लाख विदेशी नागरिक आले होते, ही संख्या २०१९ मध्ये सात लाख झाली होती. पण कोरोना साथीमुळे ही संख्या २०२०मध्ये पावणे दोन लाख इतकी कमी झाली. आता कोरोनाचे संकट दूर झाल्याने असे रुग्ण येण्यास पुन्हा सुरवात झाली आहे. यावरून या क्षेत्राला संघटीत करून ‘मेडिकल टुरिझम’ धोरण राबविले जाणार आहे. इतर देशात उपचार करून घेण्यास जाणाऱ्यांचे प्रमाण वाढत चालले असून त्यात सुमारे ८० अब्ज डॉलरची उलाढाल होते. सिंगापूर, मलेशिया, थायलंड या देशांनी ‘मेडिकल टुरिझम’ला संघटीत रूप देऊन यातील मोठा वाटा आपल्याकडे घेतला आहे तर मेक्सिको, ब्राझील आणि तुर्कस्ताननेही त्यात चांगला जम बसविला आहे. यातील मोठा वाटा घेण्याची क्षमता भारतात असूनही त्यासाठीचे सरकारी धोरण निश्चित झाले नसल्याने तो आज मिळू शकत नाही. नेमकी हीच त्रुटी आता दूर होणार आहे.

### ‘मेडिकल टुरिझम’चे विविध पैलू

अर्थ प्रहर

यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

आगामी काळात सरकारकडून ‘मेडिकल टुरिझम’ विषयीचे धोरण जाहीर होईल. त्याचे काही पैलू असे– १. पर्यटन, आरोग्य, हवाई वाहतूक, वाणिज्य आणि आयुष विभाग एकत्र येवून या धोरणात योगदान देतील. २. देशातील चांगली रुग्णालये त्यासाठी निवडली जातील, त्यांना दर्जा प्रदान करण्यात येईल आणि त्यासंबंधीची सर्व माहिती वेबसाईटवर उपलब्ध असेल. ३. आयुर्वेद, योगा आणि नॅचरोपथी भारताचीच असल्याने त्याचा जगात स्वीकार वाढेल, असे प्रयत्न केले जातील. ४. इन्क्रेडिबल इंडिया अंतर्गत ‘हिल इन इंडिया’ अशी मोहीम हाती घेतली जाईल, ज्यात भारतात या क्षेत्रात स्वस्तात उपलब्ध असलेल्या सेवा सुविधांचा जगभर प्रचार प्रसार केला जाईल. ५. आयुष व्हिसा सुरु करण्यात येईल, म्हणजे उपचार घेण्यासाठी येणाऱ्यांना प्राधान्याने व्हिसा मिळेल तसेच त्याच्या नोंदी ठेवणे शक्य होईल. सध्या अशा रुग्णांना प्रवासी व्हिसावर भारतात यावे लागते. ६. विकसित देशात डॉक्टरांची भेट घेण्यास बरीच प्रतीक्षा करावी लागते, ही तेथील त्रुटी लक्षात घेवून फोनवर उपचार सल्ला देण्याच्या सेवेला जागतिक व्यापार संघटने(डब्ल्यूटीओ) कडून मान्यता मिळावी, यासाठी प्रयत्न केले जातील. ७. विकसित देशांमध्ये भारतीय वैद्यकीय पदव्यांना मान्यता नाही, मात्र भारतीय डॉक्टर जगात अतिशय निष्णात मानले जातात. ही स्थिती लक्षात घेता भारतातील वैद्यकीय पदव्यांची मान्यता वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातील. ८.‘मेडिकल टुरिझम’ ची भारतातील उलाढाल सध्या (२०१९) पाच ते सहा अब्ज डॉलर आहे, ती २०२६ पर्यंत १३ अब्ज डॉलरवर नेण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे.

‘मेडिकल टुरिझम’मध्ये भारत आज जगात साधारण सहाव्या क्रमांकावर आहे. शेतीला अनुकूल हवामान आणि सुपीक जमिनीचे अधिक प्रमाण, यामुळे भारत हा जगातील अनेक देशांना धान्य पुरविणारा देश आहे आणि तो या क्षेत्रात मोठी झेप घेऊ शकतो. कारण शेती करणाऱ्यांचे प्रमाण अजूनही भारतात अधिक आहे. त्यासंबंधीच्या सरकारी धोरणात सुधारणा झाली तर शेती निर्यात वाढते आहे, असे गेल्या काही वर्षांत लक्षात आले आहे. तोच धडा ‘मेडिकल टुरिझम’ बाबतही उपयोगी ठरणार आहे. कारण कुशल मनुष्यबळ, हवामान, वैद्यकीय पायाभूत सुविधा, औषधांची निर्मिती आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आयुर्वेद, योगा आणि नॅचरोपथीचा उगमच भारत असल्याने मिळणारा फायदा, अशा सर्व बाजूंनी ‘मेडिकल टुरिझम’ला मोठी संधी दिसून येत आहे.

---

# गैरसमज मनात ठेवून तांत्रिक विश्लेषण करणे चुकीचे का आहे?

***शेअर बाजारातील तांत्रिक विश्लेषणाविषयी अनेक गैरसमज आहेत. ते दूर करून या विश्लेषणाकडे पाहण्याची गरज आहे. शेअर बाजारात यशस्वी होण्यासाठी तांत्रिक विश्लेषणाबरोबरच त्या विषयाचे सखोल शिक्षण, संपूर्ण ज्ञान, उत्तम पैसे व्यवस्थापन कौशल्य आणि भरपूर शिस्त आवश्यक आहे.***

तांत्रिक विश्लेषण या भागातील लेखात आपण टेक्निकल ॲनालिसिसचे फायदे जाणून घेतले. आता आणखी कांही महत्त्वाच्या गोष्टी जाणून घेऊ. तांत्रिक विश्लेषण हा विषय जाणून घेण्याआधी त्याबद्दलचे गैरसमज काय आहेत ते पाहुयात.

१. तांत्रिक विश्लेषण फक्त इंट्राडे ट्रेडिंगसाठी आहे– हा तांत्रिक विश्लेषणाबद्दल एक अतिशय सामान्य समज आहे. परंतु तांत्रिक विश्लेषणाचा इतिहास सांगतो की, संगणक उत्क्रांती होण्यापूर्वीपासून ते अस्तित्वात होते. म्हणजे नंतर संगणक आले मग शेअर्सचे व्यवहार संगणकाद्वारे होऊ लागले. त्यानंतर दैनंदिन सौदेपूर्ती होऊ लागली व त्यामुळे डे–ट्रेडिंगचा जन्म झाला. त्यामुळे तांत्रिक विश्लेषण हे शेअरच्या किंमतीतील चढ–उतार यांचा अभ्यास करून दीर्घकालावधीसाठीचे खरेदी–विक्री निर्णय घेण्यास देखील मदत होते, अर्थातच तांत्रिक विश्लेषणाचा जास्त उपयोग इंट्रा–डे ट्रेडिंगसाठी करून घेता येऊ शकतो कारण दररोज, मिनिटागणिक कंपन्यांची मूलभूत तत्त्वे बदलत नाहीत, परंतु क्षणागणिक त्यांच्या शेअर्सच्या भावात फरक पडत असतो.

२. तांत्रिक विश्लेषणाचा वापर केवळ लहान/फुटकळ व्यापाऱ्यांद्वारेच केला जातो– हा आणखी एक सामान्य गैरसमज आहे, परंतु मोठे कॉर्पोरेट्स, हेज फंड्स, वित्तसंस्था यांच्याकडे शेअरबाजाराचे अथवा शेअरच्या भावाचे तांत्रिक विश्लेषण करण्यासाठी एक समर्पित टीम असते आणि ते अल्गो आधारित आणि उच्च आवर्ततेचे व्यवहार करतात आणि एक्सचेंजवर मोठ्या प्रमाणात उलाढाल करत असतात. त्यामुळे तांत्रिक विश्लेषणाचा आधार छोटे–लहान ट्रेडर्स व कोट्यवधींची उलाढाल करणारे मोठे ट्रेडर्सदेखील घेऊ शकतात.

३. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे किंमतीच्या लक्ष्यांचा अचूक अंदाज लावता येतो– नवशिके किंवा अननुभवी ट्रेडर्स अचूक किंमती बिंदूंसह बाजाराचा अंदाज लावायचा प्रयत्न करतात परंतु दिग्गज किंवा मुरलेले ट्रेडर्स किंमतपट्टा जोखून बाजाराचा अंदाज लावतात. एखाद्यानं हे समजून घेतलं पाहिजे की, तांत्रिक विश्लेषणाधारे अचूक किंमत ठरवता येत नाही तर एक पातळीच्या आधारे संभाव्य किंमतपट्ट्याचा अंदाज लावता येतो.

४. तांत्रिक विश्लेषण सोपं आहे – यूट्यूबर्स आणि तांत्रिक विश्लेषण शिकवणाऱ्या लोकांच्या दाव्यांमुळे सर्वात मोठा गैरसमज हा ट्रेडर्स जगतात निर्माण झाला आहे की,




तांत्रिक विश्लेषण हे खूप सोप्पे आहे. असे कोर्स विकणारे किंवा तांत्रिकी विश्लेषणाचे सॉफ्टवेअर विक्रेते यशाची अगदी १०० टक्के हमी देतात व तसाच प्रचार करतात ज्यामध्ये अजिबात तथ्य नाही.

शेअर बाजारात यशस्वी होण्यासाठी तांत्रिक विश्लेषणाबरोबरच त्या विषयाचे सखोल शिक्षण, संपूर्ण ज्ञान, उत्तम पैसे व्यवस्थापन कौशल्य आणि भरपूर शिस्त आवश्यक आहे.


प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com

तांत्रिक विश्लेषणाची तत्वे– १. प्रत्येक घडामोडीचे प्रतिबिंब बाजारात उमटते (Market discounts everything) –तांत्रिक विश्लेषणात ’का’ पेक्षा ’कसं’ यास जास्त महत्त्व आहे– एखाद्या कंपनीच्या शेअर्सच्या भावात लक्षणीय चढाव अथवा उतार ’का’ झाले यापेक्षा ते ’कसे’ झाले हे तांत्रिक विश्लेषण नमूद करत असते.

तांत्रिक विश्लेषणाबाबत एक मोठी टीका ऐकू येते की तांत्रिक विश्लेषणामध्ये कंपनीच्या मूलभूत घटकांकडे दुर्लक्ष करून केवळ शेअर भावातील चढ–उतारांचा विचार केला जातो. तथापि, तांत्रिक विश्लेषण असे गृहीत धरते की, कोणत्याही वेळी कंपनीच्या मूलभूत गोष्टींवर प्रभाव टाकणाऱ्या किंवा प्रभावित करणाऱ्या प्रत्येक गोष्टीचे प्रतिबिंब गोष्ट हे त्या कंपनीच्या शेअरच्या भावात उमटत असते.

तांत्रिक विश्लेषकांचा असा विश्वास आहे की, कंपनीच्या मूलभूत तत्त्वांसह, व्यापक आर्थिक घटक आणि बाजाराची मानसिकता, या सर्व घटकांचा स्वतंत्रपणे विचार करण्याऐवजी या सगळ्या गोष्टी एकत्रितपणे त्या कंपनीच्या शेअर भावावर परिणाम करत त्या कंपनीच्या शेअरचे भाव ठरवत असतात. त्यामुळेच केवळ शेअरभावातील चढ–उतारांचे विश्लेषण महत्त्वाचे ठरते, जे तांत्रिक सिद्धांत बाजारातील अथवा विशिष्ट शेअरची पुरवठा व मागणी संबंध अभ्यासते.

२. शेअरच्या किंमती या एका कलरेषेत वाटचाल करतात तांत्रिक विश्लेषणामध्ये, भावातील बदल हे एखाद्या कलरेषेस अनुसरुन चालतात असे मानले जाते. याचा अर्थ असा की, एकदा बाजारातील कल प्रस्थापित झाल्यानंतर, भावी किमतीची हालचाल त्याच्या विरोधात असण्यापेक्षा त्या दिशेने असण्याची अधिक शक्यता असते. बहुतेक तांत्रिक धोरण या गृहीतकावर आधारित आहेत.

बाजारात तीन प्रकारचे कल असतात, उर्ध्वमुखी, अधोमुखी व या दोन्ही दरम्यान आणि डाऊ थिअरीनुसार, बाजारात तीन कलप्रकार आहेत. प्राथमिक किंवा मुख्य कल–बाजारामधील हा प्रमुख कल असतो. हा कल सूचित करतो की दीर्घकालीन व्यापक बाजाराची वाटचाल कशी होती. प्राथमिक कल अनेक वर्षे टिकू शकतो.

दुय्यम कल– दुय्यम कल हा प्राथमिक ट्रेंडमधील सुधारणा मानला जातो. त्यामुळे हा कल प्राथमिक प्रवृत्तीच्या विरुद्ध हालचाल दर्शवतो. उदाहरणार्थ, जर प्राथमिक कल वरच्या दिशने (तेजी) असेल, तर दुय्यम कल खालच्या दिशेने असेल. हा प्रकार काही आठवडे ते काही महिन्यांचा असू शकतो.

उदाहरण– तेजीच्या बाजारातील सुधारणा, मंद बाजारातील दीर्घ रॅली आणि रिकव्हरी. हा कल काही आठवडे ते अनेक महिन्यांदरम्यान टिकू शकतो.

छोटे कल– हे बाजारातील दैनंदिन हालचालीतील चढउतार असतात. साधारणपणे हे असे कल एका महिन्यापेक्षा कमी काळ टिकतात आणि दुय्यम ट्रेंडच्या हालचालींच्या विरोधात जातात.

३. इतिहासाची पुनरावृत्ती– तांत्रिक विश्लेषणातील आणखी एक महत्त्वाची कल्पना अशी आहे की, इतिहासाची पुनरावृत्ती होत असते, मुख्यत्वे किमतीच्या चढ–उताराच्या बाबतीत. किमतीच्या हालचालींच्या पुनरावृत्तीचा संबंध बाजारातील ढोबळ मानसिकतेशी लावला जातो.

बाजारातील हालचालींचे विश्लेषण करण्यासाठी आणि कल समजून घेण्यासाठी तांत्रिक विश्लेषण विविध आलेख प्रकार वापरते जरी यापैकी बरेच आलेख प्रकार हे १०० वर्षांहून अधिक काळ वापरले गेले असले तरी, ते अद्यापही अबाधित आहेत असे मानले जाते कारण ते किंमतींच्या हालचालींमधील नमुने दर्शवतात जे वारंवार स्वतःला पुनरावृत्तीत होतात. दरम्यान, शेअर बाजारात तांत्रिक विश्लेषण पाहणे खूप गरजेचे आहे. या पुढील लेखांत आपण बाजाराच्या विविध अवस्था पाहणार आहोत.

---

## अर्थसाक्षर स्पर्धा : २८

### निकाल पुढीलप्रमाणे

**प्रश्न क्र. १. पुढील पैकी कोणती कंपनी आर्टीफिशीयल इंटलिजियन्स क्षेत्रात काम करणारी नाही?**
*ई.* बीएएसएफ इंडिया

**प्रश्न क्र. २. पुढील पैकी कोणत्या कंपनीचा सेन्सेक्स ३० कंपन्यांत समावेश होत नाही?**
*ई.* बजाज ऑटो

**प्रश्न क्र. ३. भारताला आपल्या गरजेच्या इतके टक्के इंधनाची आयात करावी लागते?**
*आ.* ८५ टक्के

**अर्थसाक्षर स्पर्धा १४च्या प्रश्नांना एकाही स्पर्धकाने बरोबर उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्थसाक्षर स्पर्धा २८साठी एकही विजेता नाही.**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २९

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. निफ्टी प्राईव्हेट बँक निर्देशांकात पुढीलपैकी कोणत्या बँकेचा समावेश होत नाही?**
*अ.* कोटक महिंद्र बँक *आ.* अक्सेस बँक
*इ.* आयडीएफसीफस्ट बँक *ई.* युको बँक

**२. निफ्टी आयटी निर्देशांकात पुढीलपैकी कोणत्या कंपनीचा समावेश होत नाही?**
*अ.* एल अँड टी इन्फोटेक *आ.* माइंडट्री
*इ.* आयटीसी *ई.* विप्रो

**३. पुढीलपैकी कोणत्या कंपनीचे बाजारमूल्य सात लाख कोटींच्या वर नाही? (जुलै २०२२)**
*अ.* रिलायन्स इंडस्ट्रीज *आ.* एलआयसी
*इ.* टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस *ई.* एचडीएफसी बँक




**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई–स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# केंद्रीय अर्थ राज्यमंत्र्यांना साकडे

## पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांना पाच लाख रुपये द्यावेत –सुनील गोगटे

**कर्जत : बातमीदार, प्रतिनिधी**

विमा संरक्षण अंतर्गत पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांना पाच लाख रुपये देण्यात यावेत, अशी मागणी संघर्ष समितीचे सुनील गोगटे यांनी नवी दिल्ली येथे जाऊन केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

आपल्या हक्काच्या पैशासाठी पेण बँकेच्या ठेवीदारांनाचा १२ वर्षांपासून लढा सुरू आहे. बँकेच्या ठेवीदारांना त्यांच्या मुदत ठेवी परत मिळाव्यात, या मागणीसाठी संघर्ष समितीचे सुनील गोगटे यांनी केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड यांची नुकताच नवी दिल्लीत भेट घेतली. त्या वेळी त्यांच्यासोबत सर्वेश गोगटे, अक्षय सर्वगोड, राहुल मसणे आदी उपस्थित होते.





पेण को-ऑप बँकच्या दीड लाख ठेवीदारांचे पैसे १२ वर्षांपासून अडकून पडले आहेत.

अनेक ठेवीदार ७५ वर्षावरील झाले असून त्याच्या ठेवीवरील व्याजावर त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे, मात्र बँक बुडीत निघाल्यापासून त्यांची अवस्था फार वाईट झाली आहे. बँक बुडाल्याच्या धक्क्याने अनेक ठेवीदार मृत्युमुखीदेखील पडले आहेत. ठेवीदारांनी भविष्यासाठी जमा केलेल्या पुंजीवर बँकेच्या विश्वस्त मंडळाने डल्ला मारला असून त्यामुळे सामान्य ग्राहकांची आर्थिक कोंडी झाली आहे. ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळावेत यासाठी पेण अर्बन बँक संघर्ष समितीचा लढा सुरु आहे. त्याचाच एक भाग म्हणून संघर्ष समितीचे सुनील गोगटे यांनी नवी दिल्लीत केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड यांची भेट घेतली.

या वेळी गोगटे यांनी, पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांना विमा संरक्षण अंतर्गत पाच लाख रुपये देण्यात यावेत, अशी मागणी केली.

पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांना त्यांच्य ठेवी परत मिळाव्यात यासाठी भारत सरकारचा अर्थ विभाग सकारात्मक आहे. आपण लवकरच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेऊन रिझर्व्ह बँकेला काय सांगता येईल याविषयी विचारविनिमय करणार असल्याचे भागवत कराड यांनी पेण अर्बन बँक संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांना सांगितले.

## शिवसेनेचे पेण तालुकाप्रमुख तुषार मानकवळे सहकाऱ्यांसह शिंदे गटात दाखल

**पाली : प्रतिनिधी**

एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात सरकार स्थापन झाल्यापासून रायगड जिल्ह्यातील शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आमदार महेंद्र दळवी यांच्या नेतृत्वाखाली शिंदे गटात सामील होत आहेत. शिवसेनेचे पेण तालुका प्रमुख तुषार मानकवळे यांनी त्यांच्या अनेक सहकाऱ्यांसह शुक्रवारी (दि. २२) शिंदे गटात प्रवेश केला. अलिबाग येथे झालेल्या कार्यक्रमात आमदार महेंद्र दळवी व युवा नेते राजा केणी यांनी त्या सर्वांचे स्वागत केले.

रायगड जिल्ह्यातील शिवसेनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते येत्या काही दिवसात शिंदे गटात सामील होतील, असा विश्वास आमदार महेंद्र दळवी यांनी या वेळी व्यक्त केला. तुषार मानकवळे यांनी या वेळी मनोगत व्यक्त केले. धीरज पाटील, आशिष वर्तक, शैलेश पाटील, दीपक चरवट, विकी मानकवळे, राहुल पाटील, सरिता पाटील, सुशांत घाडगे, हर्षद पाटील आदी या वेळी उपस्थित होते.



(छाया : धम्मशील सावंत)

## मुंबई–पुणे महामार्गावर खड्ड्यांत आदळून पाच वाहनांना अपघात

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर हद्दीतील हॉटेल बागेश्रीसमोर मुंबई–पुणे महामार्गावर पडलेल्या खड्ड्यांत आदळून शनिवारी (दि. २३) तब्बल पाच दुचाकी वाहनांना अपघात झाला.

या अपघातात दोनजण जायबंदी झाले असून त्यांना खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहे. तर पाच दुचाकीस्वार प्रथमोपचार करून मोडतोड झालेली वाहने दुरुस्तीसाठी गॅरजकडे रवाना झाले.

हॉटेल बागेश्रीसमोर महामार्गावर पडलेल्या खड्ड्यात पावसाचे पाणी साठले की या खड्ड्यांचा वाहनचालकांना अंदाज येत नाही. विवेक पिंगळे (वय ३०, रा. पनवेल) हे ढेकू औद्योगिक वसाहतीत खाजगी कंपनीत नोकरी करतात. शनिवारी त्यांची दुचाकी हॉटेल बागेश्रीसमोरील खड्ड्यांत आदळली. या अपघातात पिंगळे जखमी झाले.





अशाच प्रकारे हॉटेल बागेश्री परिसरात शनिवारी पाच वाहनांचे अपघात झाले. मागील दिड महिन्यात या परिसरात २५ वाहनचालक जखमी झाले आहेत.

## जुन्या महामार्गावर दुरुस्तीचा देखावा

### अपुऱ्या साधनसामग्रीमुळे दुरुस्तीचे काम कोमात

**खालापूर : प्रतिनिधी**

पावसाने मुंबई–पुणे जुन्या महामार्गावरील खालापूर ते खोपोली या दोन किलोमीटर अंतरात खड्ड्यांनी शंभरी गाठली आहे. हे खड्डे भरण्यासाठी १० मजूर व एकच रोलर फिरत असून, खड्डे भरले की पुन्हा तेच खड्डे मोठे होत असल्याने मागे पाठ पुढे सपाट अशी अवस्था झाली आहे.

मुंबई–पुणे राष्ट्रीय महामार्गावरील खालापूर ते खोपोली फाटा या सात किलोमीटर रस्त्याच्या दुपदरिकरणाचे काम २०१७ मध्ये सुरू झाले होते. कामाच्या निकृष्ट दर्जामुळे सध्या या रस्त्याची दूरावस्था झाली आहे. खालापूर ते खोपोली रस्त्याची देखभाल व दुरुस्ती २०२३पर्यंत ईगल इन्फ्रा कंपनीकडे आहे.



(छाया : अरुण नलावडे)

पावसामुळे या महामार्गावर खालापूर ते महडपर्यंत जवळपास शंभरपेक्षा अधिक खड्डे पडले असून शनिवारी खोपोलीच्या दिशेने जाणारी दुचाकी खड्ड्यात आपटून अपघात झाल्याची घटना घडली. त्या अगोदर दुचाकी अपघातात महिलेचा जीव गेला होता. त्यावेळी ठेकेदारा विरोधात कारवाई करावी, या मागणीसाठी खालापूर पोलीस ठाण्यात नागरिक आक्रमक झाले होते.

खालापूर–खोपोलीदरम्यानच्या महामार्गाची दुरुस्ती व्हावी यासाठी खालापूर तहसील कार्यालयात परिसरातील नागरिक व रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी व ठेकेदार याच्यात किमान १५ बैठका झाल्या आहेत, परंतु त्यानंतरदेखील ठेकेदार निष्क्रिय असल्याने संताप व्यक्त होत आहे.

> **पावसाळ्यात खालापूर–खोपोली रस्ता अतिशय दयनीय होतो, हे माहिती असतानादेखील ठेकेदारांने अगोदर आवश्यक काळजी न घेतल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे.**
> **–मनोज कळमकर, सामाजिक कार्यकर्ते, खालापूर**

> **पाऊस थांबला की लगेच खड्डे बुजविण्याचे काम हाती घेत असून त्यासाठी रोलरचा वापरदेखील करीत आहोत.**
> **–कल्पेश पाटील, साईड व्यवस्थापक, ईगल इन्फ्रा कंपनी**



## माणगावच्या काळ नदीत मगरींचा सुळसुळाट

**माणगाव : प्रतिनिधी**

मुसळधार पावसामुळे माणगावातील काळ नदीत मगरींचा वावर वाढल्याने या नदीकाठच्या नागरिकांतून भीती व्यक्त होत आहे. गेले अनेक दिवस येथील काळ नदीत सतत मगरी दिसत असून, त्यांना पाहण्यासाठी मुंबई–गोवा महामार्गावरील माणगाव पुलावर गर्दी होत आहे.

माणगाव काळ नदीमध्ये पूरसदृश्य स्थिती निर्माण झाल्यानंतर गेल्या वर्षी खांदाड आदिवासीवाडीकडे जाणाऱ्या मार्गावर सहा फूट लांबीच्या भल्यामोठ्या मगरीचे दर्शन झाले होते. त्यामुळे माणगाव परिसरात गेल्या दोन वर्षापासून मगरीचा वावर वाढला असल्याच्या वृत्तावर शिक्कामोर्तब झाले आहे.



(छाया : सलीम शेख)

माणगाव नगरपंचायत हद्दीतील सुतार आळी भागात मुंबई–गोवा महामार्गावर आठ दिवसांपूर्वी अज्ञात वाहनाची धडक लागून एका मगरीचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर शुक्रवारी (दि. २२) दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास काळ नदीपात्राकडेला सुकलेल्या गवतावर काही पादचाऱ्यांना पुन्हा मगर दिसली. त्यावेळी वेळी महाविद्यालयातील विद्यार्थी घराकडे निघाले होते, त्यांनी ही मगर बघण्यासाठी काळ नदीपुलावर गर्दी केली होती.

काळ नदीकाठी अनेकांची घरे आहेत. तसेच निकम इंग्रजी माध्यमाचे स्कूल आहे. नदीत मगरींचा वावर वाढल्याने नदीकाठचे लोक चिंता व्यक्त करीत आहेत. या मगरीचे संवर्धन शासनांनी करावे, अशी मागणी नागरिक करीत आहेत.



## जिल्हाधिकारी कार्यालयात लोकमान्य टिळक यांना अभिवादन

**अलिबाग : जिमाका**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना जयंतीनिमित्त शनिवारी (दि. २३) अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या प्रतिमेला जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

## वरसोलीत 'गेल इंडिया'ची स्वच्छता मोहीम

### प्रिझम संस्थेचे पथनाट्य

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

स्वच्छता पंधरवडा निमित्ताने उसर येथील गेल इंडिया लिमिटेड कंपनीच्या वतीने वरसोली समुद्र किनाऱ्यावर श्रमदानातून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या वेळी अलिबाग समुद्र किनाऱ्यावर मेरा भारत, स्वच्छ भारत या पथनाट्यातून प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या वतीने स्वच्छतेविषयी तसेच प्लास्टिक बंदी, कोविड लसीकरण यांसह विविध विषयांवर जनजागृती करण्यात आली.



(छाया : तपस्वी गोंधळी)

गेल इंडिया कंपनीचे मुख्य महाप्रबंधक व प्रभारी अधिकारी अनुप गुप्ता, महाप्रबंधक वीरेंद्र कुमार, कासिवेलराजन, जितिन सक्सेना, उपमहाप्रबंधक अतुल दलाल, एलविना आईजक, प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी गोंधळी यांच्यासह कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी तसेच सर्व कॉन्ट्रॅक्टमधील कामगार या वेळी उपस्थित होते. या पथनाट्यात विनोद नाईक, विजय शिंदे, सुचित जावरे, प्रसाद अमृते, श्रेया पाटील, मानसी पाटील, पूर्वा नाईक, समृद्धी पाटील आदी कलाकार सहभागी झाले होते.

## रोठ बुद्रुक येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

### राजमुद्रा फाउंडेशनचा वर्धापन दिन उत्साहात

(छाया : जितेंद्र जाधव)



**धाटाव : प्रतिनिधी**

राजमुद्रा फाउंडेशन या संस्थेचा वर्धापनदिन शुक्रवारी (दि. २२) रोठ बुद्रुक ग्रामपंचायत सभागृहात साजरा करण्यात आला. या वेळी दहावी, बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक साहित्य भेट वस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

फाउंडेशनचे संस्थापक अमित घाग यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. फाउंडेशनच्या माध्यमातून सरकारच्या विविध योजनांचा लाभ हा सामान्य माणसाला कशा पद्धतीने मिळवून देता येईल, याविषयी शासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात येणार असल्याचे अमित घाग यांनी या वेळी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहिल जोंधळे याने केले. सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष रोशन चाफेकर, सचिव हाजी कोठारी, फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश डाके, सल्लागार विलास डाके, रोठ बुद्रुक ग्रामपंचायत उपसरपंच वेदिका डाके, सदस्या श्रध्दा घाग, अमृता डाके, वैभवी भगत यांच्यासह विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

राजमुद्रा फाउंडेशनचे कार्याध्यक्ष राजेश भगत, सचिव श्रीकांत दरडे, सहसचिव अरुण पडवळ, पर्यावरण प्रतिनिधी सागर डाके, क्रीडा प्रतिनिधी अक्षय वारंगे, युवती प्रतिनिधी पूजा कुंडे, मेघना डाके, प्रतीक्षा घाग, ओंकार घाग, दिपेश ठाकूर यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

## उल्हास गुंजाळ यांची अध्यक्षपदी निवड

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुका माध्यमिक शाळा सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी उल्हास गुंजाळ व उपाध्यक्षपदी दत्तात्रय खुळपे यांची निवड करण्यात आली.

या पतसंस्थेची पंचवार्षिक निवडणूक नुकताच घेण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहकार कार्यालयाचे प्रमोद वाघमारे यांनी कामकाज पाहिले.

यावेळी पतसंस्थेचे सचिव म्हणून राहुल वर्तक तर सहसचिव म्हणून संतोष बुलू यांची निवड झाली. या वेळी पतसंस्थेचे सभासद उपस्थित होते.

## कर्जत नगर परिषदेतील कंत्राटी कामगारांना चार महिने पगार नाही

**कर्जत : बातमीदार**

कर्जत नगर परिषदेच्या आरोग्य विभागामध्ये काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना गेल्या चार महिन्यांपासून पगार देण्यात आला नाही. या कंत्राटी कामगारांना वेळेवर पगार मिळावा, अशी मागणी कंत्राटी कामगारांच्या संघटनेने नगर परिषदेकडे केली आहे.

कर्जत नगर परिषदेच्या आरोग्य विभागात अनेक कंत्राटी कामगार काम करतात. महागाई भत्त्यात वाढ, मेडिक्लेम सुविधा व चेंजिंग रुम मिळावी, या मागण्यासाठी या कंत्राटी कामगारांनी जुलै २०२१ मध्ये काम बंद आंदोलन केले होते. त्यावेळी शहरात कचऱ्याचे ढिग जमा झाले होते.

नगर परिषदेने तातडीने आंदोलक कर्मचाऱ्यांशी संवाद साधून मागण्यांची पूर्तता करण्याचे आश्वासन दिले होते. दरम्यान, ठेकेदाराने या कंत्राटी कामगारांना गेल्या चार महिन्यांपासून पगार दिलेला नाही.

कंत्राटी कामगारांना थकीत पगार आणि अन्य सोयीसुविधा मिळत नसल्याबद्दल त्यांचे नेते माजी नगरसेवक अरविंद मोरे यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

थकीत वेतनाबाबत या कंत्राटी कामगारांच्या प्रतिनिधींनी कर्जत नगर परिषदेच्या आरोग्य निरीक्षकांबरोबर चर्चा केली. आरोग्य निरीक्षकांनी आपण जुन्या ठेकेदाराकडे असललेली थकीत रक्कम वसूल करण्यासाठी पत्रव्यवहार केला असल्याची माहिती दिली. मात्र कंत्राटी कामगारांनी थकीत पगाराच्या प्रश्नावर आंदोलन करण्याची शक्यता बोलून दाखवली आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पोयंजे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे – पोयंजे, तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड**

| मौजे | भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) |
|---|---|---|---|
| पोयंजे | रामदास पांडुरंग मते | नवीन सर्व्हे नं. २७ (जुना सर्व्हे नं. ४४) | ०–१९–० |


तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, इजमेंट, वारसाहक्क वगैरे इतर कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**ता. २२/०७/२०२२**
**पनवेल**

**सही/–**
**ॲड. वाय. एस. भोपी**
**१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स,**
**ता. पनवेल, जि. रायगड.**
**मोबाईल : ९७६८३७३२५५**

# प्रसंगी अखंडीत वाचीत जावे

**संवेदनशील माणसांची व्यक्त होणे ही गरज असते. शब्द हे व्यक्त होण्याचे प्रभावी साधन आहे. मनात साचलेल्या भावभावना, संवेदना, जीवन जगताना आलेले कडू गोड अनुभव यांचा अंतर्मनातील अविष्कार म्हणजे पुस्तके, ग्रंथ! माणसे लिहित असतात, व्यक्त होत असतात आणि वाचणारे वाचत जातात, तादात्म्य होतात. कालानुरूप, व्यक्तीनुरूप लिहिण्याची भाषा, शैली, विचारांचे वेगळेपण त्या लिखाणातून डोकावत असते. काही पटत, काही पटत नाही. पण तरीही आपण वाचतच राहतो. व्यक्त होणारे व्यक्त होत राहतात. म्हणून वाचणारे आहेत तो पर्यंत लिहिणारे लिहित राहतील आणि लिहिते आहेत तोपर्यंत वाचणारे वाचत राहतील. इतर माध्यमांची कितीही आक्रमण झाली तरीही पुस्तके येत राहतील. ती आपली मित्र, गुरू, मार्गदर्शक असतात. रोज बरच काही नवे येत असते. तरी जुने मनात ताजे असते, स्वत:चे अस्तित्व जागवत. पुस्तके ज्ञान, वैचारिक ऐश्वर्य देतात, मनोरंजन करतात, जगण्याचा आधार असतात आणि आत्मानुभूतीपर्यंतचा आपला प्रवास सोपा करतात. म्हणूनच दासबोध ग्रंथात समर्थ रामदास स्वामी लिहून गेलेत 'दिसामाजी काहीतरी ते लिहावे, प्रसंगी अखंडीत वाचीत जावे'!**






अॅड. सुनिता जोशी
साहित्यिका, पनवेल

वाचाल तर वाचाल
साहित्यिकांची आवडती पुस्तके




## मजेत जगावं कसं? –शिवराज गोर्ले

जगण हे प्रत्येकालाच अनिवार्य आहे. हे जीवन जगताना प्रत्येकालाच जीवनातल्या सुख–दु:ख, आशा– निराशा, चढ –उतार या खेळाला सामोरं जावं लागतं. कविवर्य मंगेश पाडगावकरांच्या कवितेप्रमाणे एखादा निराशावादी माणूस त्याच्या हातातला पेला अर्धा रिकामा आहे याचं दु:ख करीतच कसंबसं जगतो आणि खंगत मरतो. तर दुसरा आशावादी माणूस त्याच्या हातातला पेला अर्धातरी भरलेला आहे याचंच समाधान मानत जगतो आणि वर्षानुवर्षं नुसतं जगत राहतो, पण त्या दोघांच्याही हातातल्या पाण्यानं भरलेल्या तांब्यातलं पाणी पेल्यात ओतून तो पूर्ण भरावा आणि पोटभर पाणी प्यावं, ही साधी गोष्ट त्याना कुणीच कसं सुचवत नाही? त्यांना ती साधी गोष्ट सुचवण्याचं आजवर कुणी न केलेलं विधायक काम मराठी भाषेपुरतं पार पाडणारं खेळकर, खुमासदार, हलक्या फुलक्या शैलीतलं एक 'क्रांतिकारक' पुस्तक म्हणजेच लेखक शिवराज गोर्ले याचं 'मजेत जगावं कसं' हे पुस्तक ! यश, समृद्धी, पैसा, आनंद हे मिळवण्याचे मंत्र सांगणारी अनेक इंग्रजी पुस्तकं बाजारात उपलब्ध आहेत, परंतु यावर भाष्य करणारं मराठी भाषेतलं हे पहिलच पुस्तक असावं! राजहंस प्रकाशनने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. प्रत्येकाने अवश्य वाचावं आणि आपल्या संग्रही ठेवावं असं हे पुस्तक!



## धुनी –जगन्नाथ कुंटे


चार नर्मदा प्रदक्षिणा पायी करणारे जगन्नाथ कुंटे यांची आध्यात्म व साधना यावर आधारित प्राजक्त प्रकाशनची ' नर्मदा हर हर', 'साधनामस्त', 'नित्य निरंजन' व 'कालिंदी' ही चार पुस्तके यापूर्वीच प्रकाशित झाली आहेत. त्यानंतरचे प्रकाशित झालेलं हे 'धुनी'!



ते म्हणतात साधनेची धुनी अखंड पेटती राहायला हवी! साधकानं तेवढं करावं, बाकी सारं सद्गुरूंवर सोपवावं. ते सगळं करून घेतात हे प्रभावीपणे सांगणारी ही प्रत्ययकारी आणि उत्कंठावर्धक कहाणी! साधकांना प्रचिती देणारी आणि दिशा दाखवत गुंगवून ठेवणारी! एका अनोख्या विश्वाचं दर्शन घडवतानाच त्याचा मार्ग उजळवत जाणारी, अंतर्बाह्य शांती आणि सुखाचा मंत्र सांगणारी रसरशीत, अशी अनुभवसमृद्ध प्रवासगाथा! अध्यात्म सोप्या, गोष्टरुपात सांगणारं, श्रध्दावान लोकांच्या आणि तरुण वाचकांच्या मनाचीही पकड घेईल असं हे पुस्तक!

'आ चल के तुझे, मै लेके चलू, एक ऐसे गगन के तले, जहा गम भी न हो, आसू भी न हो, बस प्यार ही प्यार पले', असं म्हणत, आध्यात्म म्हणजे कसं जगावं हे सांगणारं ज्ञान, म्हणजेच आयुष्याचं तत्वज्ञान आहे हेचं हे पुस्तक पानोपानी सांगत राहते!

## बदलत गेलेली सही –अंजली कुलकर्णी




स्त्रीवादी कवितेचा धांडोळा या विषयावर लेख लिहिताना नुकताच हाताला लागलेला हा कवितासंग्रह! सही म्हणजे स्वओळख, 'बदलत गेलेली सही' हा ग्रंथालीने प्रकाशित केलेला अंजली कुलकर्णी यांचा कवितासंग्रह म्हणजे माणसांच्या, हरवत चाललेल्या स्वच्या ओळखीचा, स्वच्या शोधाचा प्रवास.

एका बाजूला माणसांच्या जगण्याभोवती गरगरणारा आधुनिक काळातला, जागतिकीकरण, संगणकीकरण, युद्धखोरी आणि बाजारीकरणाचा भोवरा, त्यात हरवत चाललेला माणूस, ऐहिक लोलुपतेच्या एकाच साच्यातून जगणाऱ्या माणसांचे यांत्रिकीकरण, त्याचे ताणतणाव आणि दुसऱ्या बाजूला यासकट आणि याशिवाय पुरुषी सनातनत्वाचे चटके आणि फटके सोसणारी, तरीही स्वतःची ओळख शोधू, जपू मागणारी स्त्री! नात्यांचे ताणतणाव पेलणारी! सारं जग एका थक्क करणाऱ्या ऐहिक विकासाच्या उच्च बिंदूवर वेगानं पोचत असताना, जुन्याच परिघावर अडखळून उभी असलेली! अद्यापही चेहेराच न गवसलेली!

अंजली कुलकर्णी यांनी या आधुनिक काळात वावरणाऱ्या माणसांच्या आणि विशेषकरून स्त्रीच्या दुःखाची दुखरी नस नेमकेपणानं या कवितासंग्रहात पकडली आहे. एकाच वेळी एकतानता आणि अलिप्तता, खोल विचारशीलता आणि उत्कट भावनाशीलता यांनी या कवितेच्या वस्त्राला झळझळीत फिरता रंग बहाल केला आहे.

## क्षण क्षण शिक्षण –मानसी वैशंपायन



दैनिक तरुण भारतमधील 'क्षण क्षण शिक्षण' या सदरामध्ये सलग दोन वर्ष प्रकाशीत झालेल्या साप्ताहिक विवेक प्रकाशित लेखांचे हे पुस्तक! आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके या प्रयोगशील, संस्कारक्षम विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मानसी वैशंपायन या पुस्तकाच्या लेखिका !

'जगाच्या अनुभव शाळेत' आपण रोज हजारो नवनव्या गोष्टी कळत नकळत शिकत असतो. या अर्थाने माणूस जगाच्या पाठशाळेत निरंतर विद्यार्थीच असतो. शिकण्याचा प्रत्येक क्षण अनुभूती देणारा, जीवनाला समृद्ध करणारा असतो. याच विषयावर पुस्तकात प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षक हाच धर्म आणि विद्यार्थी हेच दैवत मानणाऱ्या सर्वांसाठी हे पुस्तक आहे. 'क्षण क्षण शिक्षण' हे अनुभव चिंतन आहे. केवळ 'आरामखुर्चीत' बसून केलेले हे चिंतन नसून त्याला प्रत्यक्ष कृती, अनुभव, यांचे अधिष्ठान आहे. वाचकांशी मनापासून साधलेला हा संवाद आहे. या पुस्तकाचे स्वरूप विचार प्रधान आहे तरी ललित निबंधानाही जवळचे आहे. लेखिकेच्या समृद्ध व अनुभवी व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब त्यात आहे. शिक्षणशास्त्र या क्षेत्रातील तज्ञाचे विपुल संदर्भ या लेखात भेटत राहतात.

---

### सततच्या पावसामुळे शेतात तुंबले पाणी

# उरणमध्ये भाताची रोपे कुजली



**शेतकरी चिंताग्रस्त**

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

पेरणीचा पाऊस उत्तम झाल्याने उरणच्या पूर्व भाग परिसरातील खाडी विभागातील भातशेतीत दमदार झालेली भाताची रोपे नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे पाणी शेतात तुंबल्याने पार कुजून गेली आहेत. भाताची रोपेच कूजन गेल्याने आता भाताची लागवट कशी करायची, असा प्रश्न शेतकरी वर्गाला पडला आहे.

उरणच्या पूर्वभाग परिसरातील आवरे, वशेणी, कळंबुसरे, चिरनेर, मोठीजुई, बोरखार, कोप्रोली, पिरकोन, खोपटे, सारडे वशेणी या विभागात खारशेतीचे प्रमाण जास्त आहे. पहिला पाऊस पडला की हे शेतकरी खाडी विभागातील भात शेतामध्ये ठिकठिकाणी छोटे छोटे गादीवाफे करून त्यावर भातबियाणांची पेरणी करतात. तद्नंतर दमदार झालेली भाताची रोपे आवटणी पद्धतीने पूर्ण शेतभर टाकून त्याची लावणी केली जाते, मात्र यावर्षी भाताची रोपे लावणी योग्य झाली असतानाच गेल्या आठ दिवसापासून पडणाऱ्या मुसळधार पावसाचे पाणी या खाडी विभागातील भातशेतीत तुंबून राहिले. परिणामतः ही भाताची रोपे पार कुजून गेली आहेत.

तुंबलेल्या पाण्यामुळे शेकडो एकर शेती बाधित झाली आहे. भात रोपांचा झालेला चिखल व शेतात पाणी असल्याने दुबार पेरणी शक्य नसल्याने यावर्षी ही भातशेती ओसाड जाण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे बाधित शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान होणार आहे.

या कुजलेल्या भातशेतीचे रीतसर पंचनामे करून कृषी विभागाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय द्या, अशी मागणी जाणकार शेतकरी भालचंद्र पाटील यांनी केली आहे.

# माजगावमध्ये पेव्हर ब्लॉकवर पावडर टाकण्याचे काम सुरू



(छाया : राकेश खराडे)

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पावसाचे दिवस असल्यामुळे पेव्हर ब्लॉकवर शेवाळी निर्माण होते. यावरून वाहने तसेच माणसे घसरण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे माजगाव ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने गावातील पेव्हर ब्लॉकवर पावडर टाकण्याचे काम सुरू आहे.

माजगावचे सरपंच गोपीनाथ जाधव, ग्रामसेवक संदीप धारणे, उपसरपंच नितिन महाब्दी, सदस्य यांच्या माध्यमातून पेव्हर ब्लॉकवर चुना टाकण्याचे काम प्रगतीपथावर सुरू आहे. ग्रूप ग्रामपंचायत माजगांव या परिसरात गावे तसेच आदिवासी वाड्यामध्ये पेव्हर ब्लॉक बसविण्यात आल्यामुळे या पासून कुणालाही त्रास होऊ नये. यासाठी हा कार्यक्रम हाती घेण्यात आला. पावसाळ्यात घरातील सांडपाणी रस्त्यावर येत असल्यामुळे पेव्हर ब्लॉक वरून वाहन तसेच नागरिकांचा पाय घसरून पाडण्याचे प्रमाण वाढले होते. नागरिकांच्या सुरक्षेतेसंदर्भात एक पाऊल पुढे घेऊन ग्रुप ग्रामपंचायत माजगावने या परिसरातील जोडणाऱ्या गावातील शेकडो घरे आदिवासी वाड्या अशा अनेक ठिकाणी चुना पावडर टाकण्याचे काम सुरू केले आहे.

दरवर्षी पावसाळ्यात चुना टाकण्याचे काम केले जाते. त्यामुळे या वर्षीसुद्धा हे काम सुरू आहे. या ग्रामपंचायतीला गावे आणि आदिवासी वाड्या जोडल्या असून बहुतेक वाड्या मध्ये पेव्हर ब्लॉक झाले आहे, मात्र त्याचा त्रास पावसाळ्यामध्ये ग्रामस्थ यांना सहन करावा लागत आहे. त्यांना होणारा त्रास नियंत्रणात यावा यासाठी विविध उपाययोजना सुरू असल्याचे ग्रामपंचायतीचे म्हणणे आहे.

> **पावसाळ्यात पेव्हर ब्लॉकवर शेवाळी निर्माण झाल्यामुळे अपघाताची समस्या गंभीर बनत आहे. ग्रामस्थांच्या सुरक्षेतेची काळजी घेत ग्रामपंचायतीमार्फत पेव्हर ब्लॉकवर पावडर टाकण्याचे काम सुरू आहे.**
>
> **–गोपीनाथ जाधव, सरपंच, माजगांव**

---

# रंगीबेरंगी राख्यांची बाजारपेठेत रेलचेल

**पनवेल : वार्ताहर**

येत्या ११ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन हा बहीण भावाच्या अतूट नात्याचा सण साजरा होणार आहे. त्यासाठी रंगीबेरंगी राख्या बाजारपेठेत फुलू लागल्या आहेत.



नारळी पौर्णिमा व रक्षाबंधननिमित्त ग्राहक मोठ्या प्रमाणात बाजारपेठेमध्ये जाऊन रंगीबेरंगी अत्याधुनिक राख्या खरेदी करत असतात. त्यामूळेच रंगीबेरंगी राख्यांची सध्या बाजारात रेलचेल दिसून येत आहे. शंभर रुपये डझनपासून एक हजाराहून अधिक किमतीच्या राख्या बाजारात विक्रीसाठी उपलब्ध आहेत, मात्र गतवर्षी दहा रुपयांना मिळणारी राखी यंदा पंधरा रुपयांना विकली जात आहे. किमतीत दरवाढ झाल्याने महिला वर्गाकडून नाराजी व्यक्त होत आहे. दोन वर्षांपूर्वी कोरोनामुळे अनेकांना रक्षाबंधनास मुकावे लागले होते. लॉकडाऊनमध्ये राख्या बनवण्याचे काम हातातून गेल्यानंतर कारागिरांनी उदरनिर्वाहासाठी दुसऱ्या ठिकाणी काम सुरू केले आहे. त्यामुळे आता राख्या बनवण्यासाठी कारागिरही उपलब्ध होत नसल्यामुळे जादा पैसे देऊन कारागिरी करून घ्यावी लागते. त्यातच आता कच्चा मालदेखील किमतीमध्ये वाढ झाली असून वाहतुकीचाही खर्च वाढला आहे. त्यामुळे राखीच्या दरात वाढ झाली असल्याचे व्यावसायिक सांगत आहेत.

राख्या खरेदीकरण्यासाठी महिला वर्गाची गर्दी सुद्धा कमी प्रमाणात दिसून येत आहेत. अनेक जण पारंपरिक राख्या खरेदीवर भर देत आहेत तर काही जण ऑनलाइन राख्या खरेदी करणे पसंत करत आहेत. शेवटच्या दोन ते तीन दिवसांत राख्यांची विक्री वाढेल, असा विश्वास राखी विक्रेत्यांकडून व्यक्त होत आहे.

# मासिक पाळीच्या दिवसांतील स्वच्छतेबद्दल जनजागृती शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

मासिक पाळीच्या दिवसातल्या स्वच्छतेबद्दल जनजागृती करण्याच्या उद्देशाने खारघरच्या मदरहुड हॉस्पीटलच्या वतीने पनवेल तामसई गावात विशेष शिबिर घेण्यात आले.

शिक्षणाचा अभाव, पारंपरिक समज, स्वच्छतेसाठी पुरेशा साधन सामुग्रीचा तुटवडा अशा कारणांनी जगभरात अनेक महिलांना मासिक पाळीच्या दिवसात स्वकर्तृत्व सिद्ध करण्याची संधी मिळत नाही. त्याकरिता महिलावर्गात याविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये ५० महिला सहभागी झाल्या होत्या.

शिबिरात सहभागी झालेल्या बहुतांश महिलांना मासिक पाळीदरम्यान पाठदुखी, पोटदुखी, अशक्तपणा आणि अपुऱ्या पोषणामुळे चक्कर येत असल्याच्या तक्रारींची नोंद करण्यात आली. शिबिरात प्रामुख्याने मासिक पाळीतील स्वच्छता आणि आरोग्य या विषयांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले होते. शिबिरादरम्यान उपस्थित सर्व महिलांना पॅडचे वाटप करण्यात आले.




# नवी मुंबईतील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना कोरोना प्रिकॉशन डोस

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्रीय आरोग्य विभागाच्या आदेशानुसार कोविड १९ लसीकरण अमृत महोत्सव अंतर्गत १५ जुलैपासून १८ वर्षांवरील नागरिकांना मोफत प्रिकॉशन डोस दिला जात आहे. आरोग्य विभागासह नवी मुंबई महानगरपालिकेच्या इतरही विभागातील अधिकारी, कर्मचारीवृंदाने पहिल्या फळीतील कोरोना योद्धे म्हणून कोविड लसीचा प्रिकॉशन डोस घेतला होता. तथापि त्यांचे १८ वर्षांवरील कुटुंबीय लसीकरणापासून वंचित होते. त्यांनाही डोस देण्यात आला आहे.



आता १८ वर्षांवरील सर्वांनाच प्रिकॉशन डोस देण्यास सुरुवात झाल्याने आज अधिकारी, कर्मचारी यांच्या कुटुंबीयांकरिता महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात प्रिकॉशन डोसचे विशेष सत्र आयोजित करण्यात आले होते. यामध्ये मुख्यालयातील आरोग्य विभागासह इतर विभागांतील अधिकारी, कर्मचारी यांच्या घरातील १८० व्यक्तींनी प्रिकॉशन डोसचा लाभ घेतला.

महापालिकेची वाशी, नेरूळ, ऐरोली ही रूग्णालये, तुर्भे व बेलापूर येथील माता बाल रुग्णालये तसेच २३ नागरी आरोग्य केंद्रे आणि ईएसआयएस रूग्णालय सेक्टर ५ वाशी येथे दुसरा डोस घेतल्यानंतर सहा महिने किंवा २६ आठवडे पूर्ण झालेल्या १८ वर्षावरील नागरिकांना मोफत प्रिकॉशन डोस दिला जात आहे.

नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन कोविड झाल्यास त्याची तीव्रता कमी करणारा प्रिकॉशन डोस घेऊन लस संरक्षित व्हावे, असे आवाहन महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# माथेरानमध्ये ई-रिक्षा सुरू करण्याच्या हालचालींना वेग

## ▪ एमटीडीसीमध्ये झाली आढावा बैठक

कर्जत : बातमीदार, बातमीदार

माथेरानमध्ये ई-वाहने चालवण्यासाठी तेथील रस्त्यांवर तीन महिने ई-वाहनांची चाचणी घ्यावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यासाठी राज्य सरकारच्या वतीने रायगडच्या निवासी उपजिल्हाधिकारी यांच्याकडून आढावा घेण्यात आला.



(छाया : संतोष पेरणे)

माथेरानची भौगोलिक रचना आणि नियम लक्षात घेऊन ई-वाहनांच्या चाचणीसाठी शासकीय स्तरावर एक समिती गठीत करण्यात आली आहे, त्या समितीची आढावा बैठक माथेरानमधील एमटीडीसी सभागृहात घेण्यात आली. ई-वाहनांची चाचणी घेण्याच्या आदेशबाबत माथेरान नगर परिषदेकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत, याचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. रायगडाच्या निवासी उपजिल्हाधिकारी पद्श्री बैनाडे यांच्यासह पोलीस उपाधीक्षक विजय लगारे, माथेरानचे महसूल अधीक्षक दीक्षांत देशपांडे, पोलीस अधिकारी शेखर लव्हे, वनाधिकारी उमेश जंगम यांच्यासह राज्य प्रदूषण नियंत्रक मंडळ, राज्य प्रादेशिक परिवहन विभाग तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत माथेरानमध्ये ई वाहनांची प्रत्यक्ष चाचणी घेण्याची कार्यवाही सुरु केली जाईल, अशी माहिती माथेरान नगर परिषदेच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी या वेळी दिली. श्रमिक रिक्षा संघटनेचे सचिव सुनील शिंदे यांनी शासनाच्या प्रयत्नाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.



(छाया : संजय करडे)

## मुरूडमध्ये विविध विकासकामांचे भूमिपूजन

मुरूड : प्रतिनिधी

मुरूड शहर व ग्रामीण भागाच्या विकासासाठी आतापर्यंत ५५कोटी रुपयांचा निधी दिला आहे. विकासाचा आराखडा तयार करा, निधी प्राप्त करून देण्याची जबाबदारी माझी, अशी ग्वाही आमदार महेंद्र दळवी यांनी शुक्रवारी (दि. २२) मुरूड येथे दिली.

मुरूडमधील दत्त मंदिराचे सुशोभीकरण व दत्त मंदिर रस्त्याचे भुमीपूजन शुक्रवारी आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. तालुक्यातील जास्तीतजास्त विकासकामे पूर्ण करण्याचा मानस त्यांनी या वेळी व्यक्त केला.

मुरूडच्या माजी नगराध्यक्षा स्नेहा पाटील, नगर परिषदेचे प्रशासक पंकज भुसे, दत्त मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष प्रमोद भायदे, सचिव आदेश दांडेकर, प्रवीण बैकर, माजी नगरसेवक संदिप पाटील, माजी नगरसेविका युगा ठाकूर, नौसिन दरोग, मेघाली पाटील, ऋषिकांत डोंगरीकर, शुभांगी करडे, दिनेश मिणमिणे, मनोज कमाने,भाई सुर्वे, विजय पाटील, भरत बेलोसे, अशोक धुमाळ आदींसह नागरिक या वेळी उपस्थित होते.

या वेळी मुरूड शहरातील सिध्दी मोहल्ला रस्ता, दत्त मंदिर रस्ता व दत्त मंदिर सुशोभीकरण, लक्ष्मीखार रस्ता व गटारे, भोगेश्वर पाखाडी रस्ता व गटार, नगर परिषद शाळा नुतनीकरण व डिजीटलायझेशन, नेताजी सुभाषचंद्र बोस आळी रस्ता, कोळीवाडा बोट हाऊस शौचालय आदि विकासकामांचे भुमीपूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



## शरद थळे यांचा समर्थकांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश

अलिबाग : प्रतिनिधी

तालुक्यातील घोटोवडे गावाचे शरद थळे यांनी त्यांच्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. भाजपचे अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, राज्य परिषद सदस्य लेले,ओबीसी सेल अध्यक्ष अशोक वारगे, जिल्हा कार्यकारीणी सदस्य समिर राणे, जिल्हा सांस्कृतिक सेल अध्यक्ष केदार आठवले,रामराज विभाग अध्यक्ष आदित्य पाटील यांच्यासह भाजप कार्यकर्ते या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी शरद थळे यांची अलिबाग तालुका चिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली.

## नागोठणे विभागातील पाणीप्रश्नी आमदार रविशेठ पाटील आक्रमक

नागोठणे : प्रतिनिधी

नागरिकांना योग्य वेळेत आणि योग्य प्रमाणामध्ये पाणी मिळणे आवश्यक आहे. त्यामध्ये कुठल्याही प्रकारची हायगय झाल्यास संबंधीतांची आम्ही गय करणार नाही, असा इशारा आमदार रविशेठ पाटील यांनी शुक्रवारी (दि. २२) नागोठणे येथे दिला.

भाजपचे नागोठणे शहराध्यक्ष सचिन मोदी यांनी शुक्रवारी नागोठणे येथील शिवगणेश उत्सव मंडळ हॉलमध्ये विभागातील पाणीपुरवठ्या संदर्भात बैठक आयोजित केली होती. या बैठकीत आमदार रविशेठ पाटील मार्गदर्शन करीत होते. नागोठण्यासह विभागामध्ये सुरळीत पाणीपुरवठा करण्याच्या सूचना त्यांनी पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.



(छाया : राज वैशंपायन)

भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मारुती देवरे, रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांबेकर, तालुका सरचिटणीस आनंद लाड, माजी जिल्हा उपाध्यक्ष किशोर म्हात्रे, तालुका उपाध्यक्ष अपर्णा सुटे, शहराध्यक्षा शितल नांगरे, सिराज पानसरे, सुभाष पाटील, राजू लवटे, संतोष लाड, मारुती शिर्के, तुकाराम राणे, परशुराम तेलंगे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग पेणचे कोठेकर, नागोठणे पोलीस निरीक्षक बाळासाहेब कुंभार, गटविकास अधिकारी शुभदा पाटील, ग्रामपंचायत पाणीपुरवठा विभागाचे उप अभियंता गांगुर्डे, सहाय्यक अभियंता आर. आर. म्हात्रे, सहाय्यक गटविकास अधिकारी एम. जे. फडतरे, विस्ताराधिकारी एस. एन. गायकवाड, नागोठणे ग्रामविकास अधिकारी मोहन दिवकर, प्रमोद गोळे यांच्यासह भाजपचे कार्यकर्ते व भागातील नागरिक या बैठकीला उपस्थित होते.

नागोठणे शहर व विभागातील पाणी समस्येबाबत भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. नऊ ते दहा कोटी खर्च होऊनही नागोठणे शुद्ध पाणीपुरवठा योजना कार्यान्वित का होत नाही, असा प्रश्न या वेळी विचारला गेला. नागोठणे विभागातील पाणीपुरवठा योजना कार्यान्वित होण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन या वेळी अधिकाऱ्यांनी दिले.

## नेरळ-कळंब मार्गावर धावणार एसटी; कर्जत आगार प्रमुखांनी घेतली बसची ट्रायल

कर्जत : बातमीदार

नेरळ-कळंब राज्यमार्गावरील १५० मीटर रस्त्याचे काम अर्धवट असल्याने या मार्गावरील एसटी गाड्यांच्या फेऱ्या बंद आहेत. त्याचा फटका ५० हून अधिक गावे आणि आदिवासी पाड्यांमधील विद्यार्थ्यांना तसेच नोकरदारांना बसत आहे. याबाबतचे वृत्त प्रसिध्द होताच शनिवारी (दि. २३) कर्जत एसटी आगाराच्या अधिकाऱ्यांनी या मार्गाची पाहणी करून एसटी बसची ट्रायल घेतली.

नेरळ-कळंब रस्त्याचे काम अर्धवट असल्याने कर्जत एसटी आगाराने या मार्गावरील एसटी गाड्या बंद ठेवल्या आहेत. नेरळ स्थानकातून कशेळे, शिंगढोल, नेरळ-गुडवण तसेच कर्जत याशिवाय नेरळ कळंब रस्त्यावरून धावणाऱ्या नेरळ-वारे, नेरळ-कळंब, नेरळ-बोरगाव, नेरळ-ओलमन, नेरळ-मुरबाड तसेच कळंब-वांगणी-कळंब, नेरळ-देवपाडा आणि नेरळ-पोशीर या गाड्या चालविल्या जातात. कोरोनानंतर एसटी संप मिटल्यावर कर्जत आगाराने नेरळ एसटी स्थानकातून गाड्या सुरु केल्या. मात्र नेरळ-कळंब रस्त्यावर नेरळ धामोते येथे रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे काम सुरु आहे, त्या ठिकाणी रस्त्याच्या एका लेनचे बांधकाम अपूर्ण आहे. त्यामुळे एसटी गाड्यांच्या फेऱ्या बंद ठेवण्यात आल्या आहेत. त्याचा फटका प्रामुख्याने जून महिन्यापासून स्थानिक विद्यार्थ्यांना बसत आहे. या भागातील विद्यार्थी हे पोशीर येथून नेरळ, बदलापूर आणि कर्जत येथे जात असतात. ते सर्व विद्यार्थी पूर्वी एसटी महामंडळाकडून सवलतीच्या दरातील पास काढून प्रवास करायचे. पण एसटी गाड्या बंद असल्याने या सर्व विद्यार्थ्यांना खासगी वाहनातून शाळा किंवा कॉलेजला जावे लागत आहे.



शुक्रवारी कर्जत एसटी आगाराचे प्रमुख शंकर यादव यांनी आपल्या सहा अधिकाऱ्यांसह नेरळ ते धामोते फाटा या दरम्यान बसमधून तीन फेऱ्या मारल्या. केवळ २० मीटर लांबीचा रस्ता खडी टाकून तयार केला तरी नेरळ एसटी स्थानकातून बस सुरु केल्या जातील, असे आश्वासन कर्जत आगार प्रमुख शंकर यादव यांनी दिले. या वेळी प्रवीण मोर्गे, दिनेश भोईर, गोरख शेप, दिनेश कालेकर, कैलास विरले, कृष्णा हाबळे आदी उपस्थित होते.

## पेण तालुक्यात आरोग्य तपासणी अभियान




(छाया : अनिस मनियार)

पेण : प्रतिनिधी

अतिवृष्टी, दुषित पाण्याचे स्त्रोत यामुळे संसर्गजन्य आजारात वाढ झाली असून, पेण शहर व ग्रामीण भागात गेल्या महिन्यापासून साथ सुरू आहे. या पार्श्वभूमीवर अंकुर ट्रस्ट व मैत्रेय राज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पेण तालुक्यात फिरत्या दवाखान्याचे आयोजन करण्यात आले आहे.

याद्वारे पेण तालुक्यातील आदिवासी पट्ट्यात मोफत आरोग्य तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे.

सदर मोफत आरोग्य तपासणी व जनजागृती मोहीम राबविण्यासाठी आदिवासी समाजातील तरूणींना दरमहा प्रशिक्षण देण्यात येत असून यामध्ये निर्मला निकेतन कॉलेज ऑफ सोशल वर्कचे विद्यार्थी आणि अंकुर ट्रस्ट व मैत्रेय राज फाऊंडेशनचे कार्यकर्ते सहभागी झाले आहेत. सदर अभियान पेण तालुक्यातील एकूण ४० आदिवासी वाड्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

# इतर मागासवर्गीय समाजातील दुर्बल घटकांसाठी विविध योजना

**राज्यातील इतर मागासवर्गीय समाजातील दुर्बल घटकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शासनाने शामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय आर्थिक विकास या महामंडळाची स्थापना केली आहे. समाजातील इतर मागासवर्गीयांच्या आर्थिक उन्नतीसाठी या महामंडळामार्फत स्वयंरोजगाराच्या विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. कोणत्या आहेत त्या योजना जाणून घेऊ या लेखाद्वारे !**

छोटे व्यवसायिक व स्वयंरोजगाराकरिता रु. एक लाखची थेट कर्ज योजना (नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याज नाही) व २० टक्के बीज भांडवल योजना. तसेच ऑनलाईन योजनांमध्ये वैयक्तिक कर्ज योजना परतावा योजना (रु.१० लाखपर्यंत) गट कर्ज व्याज परतावा योजना (रु.१० ते ५० लाखपर्यंत) या योजनांचा समावेश आहे.

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिताही या विविध कर्ज योजनांचे शामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाच्या रायगड जिल्हा कार्यालयास उद्दिष्टय प्राप्त झाले आहे.

थेट कर्ज योजना (भौतिक उद्दिष्ट १००) व २० टक्के बीज भांडवल योजना (भौतिक उद्दिष्ट ४९) या योजनांचे अर्ज शामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय महामंडळाच्या रायगड जिल्हा कार्यालयात स:शुल्क उपलब्ध आहेत.

एक लाख थेट कर्ज योजना :- सिबिल क्रेडिट स्कोर किमान ५०० असलेल्या लाभार्थ्यांना हे कर्ज महामंडळातर्फे दिले जाते. कर्ज परत फेडीचा कालावधी चार वर्षे आहे. अर्जदाराच्या वयाची मर्यादा १८ ते २५ वर्षे आहे. कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याज आकारण्यात येणार नाही. मासिक हप्ता दोन हजार ८५ रुपये आहे.

२० टक्के बीज भांडवल योजना :- कर्जाची उच्चतम मर्यादा रु. पाच लाखापर्यंत. कर्ज परतफेडीचा कालावधी पाच वर्षे आहे. अर्जदाराच्या वयाची मर्यादा वय १८ ते ५० वर्षे आहे. बँकेमार्फत लाभार्थ्यांना ७५ टक्के कर्ज उपलब्ध केले जाते. यामध्ये लाभार्थ्यांचा सहभाग पाच टक्के, महामंडळाचा सहभाग २० टक्के, बँकेचा सहभाग ७५ टक्के महामंडळाच्या कर्ज रकमेवर व्याजाचा दर सहा टक्के असतो.

या योजनांसाठी लागणारी कागदपत्रे :- पासपोर्ट साईज दोन फोटो, उत्पन्नाचा मूळ दाखला. (ग्रामीण व शहरी भागासाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाख), जातीचे प्रमाणपत्र (इ.मा.व.), दरपत्रक (कोटेशन), प्रकल्प अहवाल, आधार कार्ड, पॅन कार्ड किंवा निवडणूक ओळखपत्र शिधापत्रिकेची झेरॉक्स, सिबिल क्रेडिट रिपोर्ट थेट कर्ज योजनेकरिता (स्कोर किमान ५०० असावा), स्थानिक स्वराज्य संस्थेचे व्यवसाय करण्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र, डोमिसाईल किंवा रहिवासी दाखला, आधार कार्ड लिंक केलेल्या पासबुकची झेरॉक्स, वयाच्या पुराव्यासाठी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र/ जन्मतारखेचा दाखला. भाडेकरार किंवा संबंधित जागामालकाचे संमतीपत्र व व्यवसायाच्या जागेचा असेसमेंट उतारा इत्यादी कागदपत्रे लागतात.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (भौतिक उद्दिष्ट १२४) व गट कर्ज व्याज परतावा योजना (भौतिक उद्दिष्ट २५) या योजनांकरिता महामंडळाच्या www.msobcfdc.org या संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाईन अर्ज दाखल करता येईल.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (रु.१० लाखापर्यंत) :- ही योजना संपूर्णपणे संगणीकृत आहे. या योजनेमध्ये बँकेने रु.१० लाखापर्यंतच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या अर्जदाराने कर्जाचे हप्ते नियमित भरल्यानंतर व्याजाची रक्कम (१२ टक्के मर्यादेत) अर्जदाराच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येते.

या योजनेचा कालावधी पाच वर्षे असेल. या योजनेसाठी अर्जदाराचे वय १८ ते ५० असावे, अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. आठ लाखापर्यंत. (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार), कुटुंबातील एका व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराचे आधार संलग्न बँक खाते असणे अनिवार्य आहे. महामंडळाच्या www.msobcfdc.org (व्याज परतावा योजना पर्याय) या वेबपोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने कर्ज अर्ज भरणे आवश्यक आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणक संगणकीकृत सशर्त हेतूपत्र (Letter of Intent) दिले जाईल. अर्जदारास याआधारे बँकेकडून कर्ज मंजूर करून घ्यावे लागेल.

गट कर्ज व्याज परतावा योजना (रु. १० ते ५० लाखापर्यंत) :- इतर मागासवर्गीय प्रवर्गातील महामंडळाच्या निकषानुसार विहित केलेल्या वार्षिक उत्पन्न मर्यादेतील उमेदवारांच्या बचतगट, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, कंपनी (कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत), LLP, FPO अशा शासन प्रमाणिकरण प्राप्त संस्थांना बँकेमार्फत स्वयंरोजगार उद्योग उभारणीकरिता जे कर्ज दिले जाईल, त्या कर्ज रकमेवरील व्याज परतावा बँक प्रमाणीकरणानुसार महामंडळाकडून अदा केला जाईल.

कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. आठ लाखपर्यंत असलेल्या उमेदवारांच्या गटास बँकेकडून रु. १० ते रु. ५० लाखापर्यंत मंजूर उद्योग उभारणी करता कर्ज उपलब्ध केले जाईल. गटातील सदस्यांचे वय १८ ते ४५ पर्यंत असावे. गटातील सर्व सदस्यांचा सिबिल क्रेडिट स्कोअर किमान ५०० इतका असावा.

परतफेडीचा कालावधी- मंजूर कर्जावर पाच वर्षापर्यंत अथवा कर्ज कालावधी यापैकी जो कमी असेल तो. कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर (जास्तीत जास्त १२ टक्के व्याजदराच्या आणि रु.१५ लाखाच्या मर्यादेत) त्यातील व्याजाची रक्कम त्यांच्या आधार लिंक या खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. महामंडळाच्या www.msobcfdc.org (व्याज परतावा योजना पर्याय) या वेबपोर्टलवर गटाचा ऑनलाइन पद्धतीने कर्ज अर्ज भरणे आवश्यक आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणकीकृत सशर्त हेतूपत्र (Letter of Intent) दिले जाईल. या गटास या आधारे बँकेकडून कर्ज मंजूर करून घ्यावे लागेल.

इच्छुक गरजू इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गातील व्यक्तींनी योजनेच्या अधिक माहितीकरिता शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ लिमिटेडचे कार्यालय, श्रीराम समर्थ निर्माण संस्था मर्यादित, सदनिका क्र. १०१ पहिला मजला, चेंढरे, अलिबाग (दू. क्र. ०२१४१-२२४४८८) येथे किंवा dmobcalibagraigad@gmail.com या इ-मेल पत्त्यावर संपर्क साधावा. तसेच अधिक माहितीसाठी www.msobcfdc.org या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे जिल्हा व्यवस्थापक निशिकांत नार्वेकर यांनी कळविले आहे.

**-मनोज शिवाजी सानप,** जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग





















































दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com